दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे | अंक –२९५ | शनिवार,दि.२८ जुन २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-295 | Saturday, Dt.28 June 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4







## बीड जिल्हा परिषद अंतर्गत घरकुल, जलजीवन, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत

# उल्लेखनीय कार्य करण्यावर भर देणार – नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान

## वाढलेला भ्रष्टाचार आणि प्रलंबित प्रकरणावर कठोर कारवाईच होणार

बीड ।प्रतिनिधी

घरकुल योजना, जलजीवन पाणीपुरवठा, स्वच्छ भारत मिशन,नरेगा, शैक्षणिक गुणवत्ता यासह विविध विकास कामे पूर्ण करण्यावर भर देणार आहे. शासनाच्या विविध योजना आणि उपक्रम पूर्ण करण्याला प्राधान्य दिले जाईल असे प्रतिपादन बीड जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी पत्रकार परिषदेत केले.

बीड जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कक्षामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी शुक्रवार दिनांक २७ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजता पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत अधिक माहिती देताना ते म्हणाले, विविध विभागातील शासनाने दिलेल्या उद्दिष्ट कृतीसाठी आपण प्राधान्याने प्रयत्न करणार आहोत. बीड जिल्ह्यात दिवाळीपर्यंत ७५ हजार घरकुले पूर्ण

(उर्वरीत पान २ वर)





### भ्रष्टाचार संपवणे आणि पेंटिंग कामे मार्गी लावल्यावर भर

बीड जिल्हा परिषद अंतर्गत जो काही विविध विभागात भ्रष्टाचार फोफावलेला आहे तो पूर्णपणे संपवणे आणि जी काही कामे पेंडिंग आहेत ती कामे तात्काळ मार्गी लावण्यावर येणाऱ्या काळात माझा सर्वाधिक भर असणारा आहे. अशी स्पष्ट भूमिका घेतल्याने बीड जिल्हा परिषद अंतर्गत भ्रष्टाचार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

### प्रत्येक विभागाची आता आढावा बैठक..

बीड जिल्हा परिषद अंतर्गत शासनाच्या विविध योजनांना सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व विभागाच्या दर आठवड्याला पंधरा दिवसाला आणि महिन्याला मी स्वतः आढावा बैठक घेणार आहे.अशी स्पष्ट भूमिका घेतल्याने आता विविध विभागांमध्ये भ्रष्टाचारासाठी सामान्य लोकांची कामे पेंडिंग ठेवणाऱ्यांची धाबे देखील दणाणणार आहेत.

### घरकुलासाठी लाभार्थ्यांना मोफत वाळू मिळण्यासाठी लवकरच बैठक

ज्यांना घरकुल मंजूर झाले आहेत. त्यांना शासन निर्णयाप्रमाणे मोफत वाळू मिळावी यासाठी जिल्हाधिकारी यांच्या समवेत लवकरच बैठक होणार असून यातून सकारात्मक मार्ग काढला जाईल. आणि लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काची वाळू कशी मिळेल यावर भर असेल. अशी सकारात्मक भूमिका देखील त्यांनी घेतल्याने लाखो घरकुल लाभार्थ्यांना याचा थेट लाभ होणार आहे.


## बीडमध्ये इंडस्ट्रीज झोन वाढला पाहिजे - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन



### बीड जिल्हा उद्योजक असोसिएशनच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये विविध उद्योग व्यवसाय वाढण्यासाठी इंडस्ट्रीज झोन वाढले पाहिजेत.यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्ह्यातील उद्योजक आणि उद्योजक असोसिएशन यांची व्यापक बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी बीड जिल्ह्यातील इंडस्ट्रीज वाढली पाहिजे यासाठी सकारात्मक भूमिका घेतल्याने उद्योजक असोसिएशनच्या वतीने त्यांचा सत्कार



## धारूर तालुक्यातील बालाघाट डोंगर रांगेला चंदन तस्कराचा शाप

**चंदन तस्करी करत लाखोची माया जमा, मात्र पर्यावरणाची होतेय मोठी हानी !**

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

धारूर तालुक्यात बालाघाट रांगेमध्ये मागील अनेक दिवसापासून वृक्षतोड त्यातली त्यात चंदन तस्करी मोठ्या प्रमाणात होत असून याकडे वनविभागाचे दुर्लक्ष होत असल्याने बालाघाट डोंगर रांगेतील वृक्ष लागवड चंदनाचे झाडे कमी होत चालले आहेत. तरी वन विभागाने वृक्षतोड–चंदन चोराचा बंदोबस्त लावून कडक कारवाई करावी अशी मागणी पर्यावरण प्रेमी कडून होत आहे.

(उर्वरीत पान २ वर)



## जालना कत्तलीसाठी डांबुन ठेवलेल्या १६ गोवंशीय जनावरांची सुटका

जालना ।प्रतिनिधी

जुना जालना कुरेशी मोहल्ला येथील शकिल बासेद कुरेशी यांने १६ गोवंशीय जनावरांची कत्तल करण्यासाठी एका वाड्यात दाटीवाटीने डांबुन ठेवली असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव यांना मिळाल्याने सदर ठिकाणी कारवाई करण्याकरिता स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करुन सोबत पोलीस ठाणे कदीम जालना येथील अधिकारी व स्टापसह मिळालेल्या माहितीच्या

(उर्वरीत पान २ वर)

### निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि होम डिवाय.एसपी उमाकांत कस्तुरे यांच्या शुभहस्ते

## वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा उद्या होणार सन्मान - विकास स्वामी, वैभव स्वामी

बीड प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा अधिक गुण घेतले आहेत. आणि स्कॉलरशिप परीक्षेत यश मिळवलेले आहे अशा विद्यार्थ्यांचा बीडचे निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि होम डिवाइस पी उमाकांत कस्तुरे साहेब यांच्या शुभहस्ते यथोचित सत्कार करण्यात येणार आहे.असे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास स्वामी आणि सचिव वैभव स्वामी यांनी जाहीर केले आहे.

जगद्विवेक प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्ष आदर्श मुख्याध्यापिका शिवैक्य जगदेवी विवेक स्वामी यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून प्रतिवर्षी वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत


(उर्वरीत पान २ वर)

### प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक

इयत्ता १० वी आणि इयत्ता १२ वी परीक्षेमध्ये वीरशैव लिंगायत समाजातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी सत्कार स्वीकारण्यासाठी जगद्विवेक प्रतिष्ठान कडे नोंदणी केली आहे. अशा विद्यार्थ्यांमधून जे विद्यार्थी दहावी आणि बारावी दोन्ही वर्गातून स्वतंत्ररित्या प्रथम येतील त्यांना १००१ रुपये रोख बक्षीस तर द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख ७०० रुपये बक्षीस तसेच तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख ५०० रुपये बक्षीस देण्यात येणार असून उत्तेजनार्थ निवडलेल्या विद्यार्थ्यास ३०० रुपये रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

## १५ लाख रुपयांचा अपहार प्रकरणी

# बीड पोस्टल पतसंस्थेचे वीर,सांगळे आणि ढाका पाच वर्षासाठी निलंबित



-: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८ अ (ब) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, समृत जाधव, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड, बीड जिल्हा पोस्टल डिव्हीजन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि.बीड या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री.विष्णू किसनराव वीर, उपाध्यक्ष श्री. संतोष दादाभाऊ सांगळे व सचिव श्री. उमरसिंग लखमीचंद ढाका यांना सदर आदेशाच्या दिनांकापासुन पाच वर्षासाठी काढून टाकण्यात येत असुन सदर कालावधीची मुदत समाप्त होईपर्यंत कोणत्याही संस्थेच्या,कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून पुन्हा निवडून येण्यास, पुन्हा स्वीकृत केला जाण्यास किंवा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असणार नाही.

सदरचा आदेश आज दि.१७ जून, २०२५ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह निर्गमित केला आहे.

स्वाक्षरीत
(समृत जाधव)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, बीड.

प्रत :-

बीड ।प्रतिनिधी

बीड पोस्टल पतसंस्थेचे अध्यक्ष विष्णू किसन वीर, उपाध्यक्ष संतोष दादाभाऊ सांगळे, सचिव अमरसिंग लकमीचंद ढाका यांनी संगणमताने बीड पोस्टल पतसंस्थेत १५ लक्ष रुपयाचा अपहार केल्या प्रकरनी किरण सावंत अन्य ५ आणि दत्तात्रय गाडेकर अन्य २ अशा एकूण ९ संचालक मंडळाच्या तक्रारीवर चौकशी समिती नेमून चौकशी अंती जिल्हा उपनिबंधक साहेब अमृत जाधव यांनी यातील दोषीना चौकशी अंती तिघांना पाच वर्षासाठी निलंबित करण्यात आले. या संदर्भात दैनिक समर्थ राजयोगने परखडपणे सदरील भ्रष्टाचार उघडकीस आणला होता. या वृत्तानुसार या प्रकरणी कारवाई झाल्याने दैनिक समर्थ राजयोगचे वृत्त खरे ठरले असून यातील दोषींना दणका बसला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, पतसंस्थेचे सभासद नसलेले नातेवाईक मित्र दत्ता पंडितराव शिंदे यांना १० लाख रुपये कर्ज वाटप केले. तसेच अविनाश मारुती वाघमारे यांना पाच लाख रुपये कर्ज स्वरुपात दिले. वरील तिघांनी आपल्या पदाचा गैरवापर करून अनिमितपणे रक्कम वाटप

(उर्वरीत पान २ वर)

## कोठी येथील शेतकऱ्याचे सोलार अज्ञात व्यक्तीने फोडले, केज पोलिस स्टेशनला गुन्हा नोंद



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील कोठी गावचे रहिवासी अशोक देविदास मुळे असून त्यांचा शेती हा व्यवसाय असून दि.१० जुन २०२५ रोजी सकाळी ९ वाजता कोठीच्या म्हसोबाचा फड या क्षेत्रामध्ये त्यांची शेती असून त्यांच्या शेतातील जी.के.कंपनी ची एक सोलार प्लेट अज्ञात व्यक्तीकडून फोडण्यात आलेली आहे असे त्यांना आढळून आले.त्यांच्या प्लेटचे नुकसान झाल्या मुळे त्यांनी याचीमाहिती केज पोलिस स्टेशनला देऊन संबंधित अज्ञाता विरुद्ध रितसर गुन्हा दाखल केलेला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली केज पोलिस करीत आहेत.

## पाटोद्यात वंचित बहुजन आघाडीचे जागरण गोंधळ आंदोलन; तहसीलदारांकडून लेखी आश्वासने




पाटोदा । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून जागरण गोंधळ करत पाटोदा तहसील कार्यालयापर्यंत एका मोठ्या प्रमाणावर पायी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले, ज्यात आघाडीच्या कार्यकर्त्यांनी ९ प्रमुख मागण्यांसाठी जागरण गोंधळ आंदोलन केले. जिल्हा उपाध्यक्ष सचिन मेघडंबर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन शांततेत आणि संयमाने पार पडले.या आंदोलनामध्ये वंचित बहुजन वर्गाशी संबंधित विविध सामाजिक व आर्थिक समस्या मांडण्यात आल्या. आंदोलनाच्या प्रमुख मागण्यांमध्ये पोट खराब जमिनींची दुरुस्ती, पंतप्रधान घरकुल योजनेतील हप्त्यांचे वेळेवर वितरण, श्रमिकश्रवणबाळ व निराधार लाभार्थ्यांचे मानधन वेळेवर देणे, घरकुल लाभार्थ्यांना वाळूचे वाटप, तसेच पंतप्रधान व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनांमधील बोगस कामांची गंभीर चौकशी व

(उर्वरीत पान २ वर)




## संपादकीय

# जिल्हा परिषद शाळांना संजीवनी कोण देणार?

राज्यात मराठी भाषेला तिसरा पर्याय म्हणून पहिलीपासून हिंदीची सक्ती यावरून राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या येऊ घातलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी नव्याने कात टाकल्याप्रमाणे आक्रमक पवित्रा घेतला आहे. सत्ताधाऱ्यांनीदेखील काही प्रमाणात 'बॅकफूट'ला जात सर्वसमावेशक चर्चा करून यावर निर्णय घेण्याचे जाहीर केले. मुळातच मराठी भाषेचा पुळका घेऊन राणा भीमदेवी थाटात उतरलेल्या राजकीय नेतेमंडळींचे मराठी भाषा, मराठी शाळांवरील प्रेम हे पुतना मावशीचे प्रेम असल्याचे मागील काही वर्षांमध्ये स्पष्ट झाले आहे. स्वत:ची मुले इंग्रजी माध्यम, सीबीएसई बोर्ड, दिल्ली बोर्ड, इंटरनॅशनल बोर्ड, कॉन्व्हेंट शाळा अशा विविध इंग्रजाळलेल्या शाळांमध्ये घालायची आणि राजकीय व्यासपीठावरून मराठीच्या नावाने टाहो फोडत मराठी भाषिकांची मते मिळवायचा 'फंडा' गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू आहे. मुंबई शहर, उपनगरात तसेच कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पालघर, पनवेल-उरण, बदलापूर, कर्जत-कसाऱ्यापर्यंत मराठी भाषेच्या शाळा गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर बंद पडल्या असून त्या त्या शाळेतील शिक्षकांना 'सरप्लस' व्हावे लागल्याने त्यांना अन्य शाळांची शोधाशोध करण्याची वेळ आली आहे. नोकरी टिकविण्यासाठी सभोवतालच्या परिसरात जाऊन तेथील मुले आपल्या शाळांमध्ये आणण्यासाठी विविध प्रकारचे द्राविडी प्राणायम करावे लागत आहेत.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागात शिरकाव होऊ लागल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकाधिक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या घटल्याने तेथील शाळांनाही टाळे लावण्याची वेळ आज निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये गेल्या काही वर्षांपासून सातत्याने विद्यार्थ्यांची संख्या घटत असून यंदाही ही घसरण कायम राहिली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्या त्या ग्रामीण भागातील पालकांनी जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश न देता इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश देण्यास प्राधान्य दिल्याने अनेक जिल्ह्यांमध्ये हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांकडे पाठ फिरवली आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षणावर हे संकट गडद होत असताना शिक्षण विभाग आणि तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी उदासीन असल्याचे चित्र आहे. विद्यार्थ्यांची कमी होणारी पटसंख्या शिक्षण विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण मोफत असूनही पालक खासगी शाळांमध्ये लाखो रुपये खर्च करून शिक्षणाची निवड करत आहेत, यावरून पालकांचा सरकारी शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास ढासळत असल्याचे स्पष्टपणे पाहावयास मिळत आहे. शासन समग्र शिक्षण अभियान, शाळा दत्तक योजना, डिजिटल क्लासरूम अशा योजना जाहीर करते व राबविते. मात्र त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होते का, हाही प्रश्न आहे. पटसंख्या कमी होण्याचे प्रमाण येत्या काळात असेच कायम राहिले तर राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या अस्तित्वावरही प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्येची होणारी ही घसरण आताच थांबविली नाही तर, भविष्यात ग्रामीण भागातील शिक्षणाची आणखी अधोगती होणार, हे निश्चित आहे.

# स्वातंत्र्य सेनानी का.तात्यासाहेब पोकळे तत्व व निष्ठावान नेते होते - ह. भ. प. आदिनाथ महाराज दानवे

## कम्युनिस्ट विचार तळागाळात पोहोचवला - आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

आई - वडीलांच्या रुणातुन कधीच कोणीलाच मुक्त होत येत नसते. प्रत्येक धर्म ग्रंथ, पुराण,शास्त्रात आई वडीलांचे महत्व, त्यांचे उपकारच सांगितले आहेत. श्रध्देने केलेले कार्य हे अजरामर राहत असते. कवी, लेखक गायकांनी आईचे वर्णन केलेले आहे मात्र जगतगुरु संत तुकाराम महाराज यांनी ख-या अर्थाने बापाचे वर्णन आपल्या अभंगातुन केलेले आहे. संगोपन (सांभाळणे), संवर्धन (वाढविणे) आणि संक्रमण (संस्कार पुढे देणे) असे काम माणुस करीत असतो. मरण कुणालाच चुकविता येत नसते. मरणाचे स्मरण व देवाचे स्मरण असले की जीवन सुखकर होते. तात्यासाहेब यांनी आपल्या तत्वांशी कधीच तडजोड केली नाही. एक आदर्श जीवन ते जगले. स्वातंत्र्य सेनानी का. तात्यासाहेब पोकळे हे राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात कार्यरत होते. त्यांच्या निष्ठेला तोड नव्हती. स्वातंत्र्य सेनानी का. तात्यासाहेब पोकळे तत्व व निष्ठावान नेते होते असे प्रतिपादन ह. भ. प. आदिनाथ महाराज दानवे यांनी केले.

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील भाजपा माजी तालुकाध्यक्ष कल्याण पोकळे यांचे वडील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक का. तात्यासाहेब पोकळे यांच्या दशक्रियाविधीनिमित्त आयोजित शोकसभेत ते प्रवचन सेवेत बोलत होते.यावेळी भाजपाचे आ. सुरेश धस म्हणाले की, तात्यासाहेब पोकळे यांनी आयुष्यभर डाव्या विचार सरणीची कास धरून अपुर्ण साधनांसह आपल्या कष्टाने आणि मेहनतीने कम्युनिस्ट विचार तळागाळात पोहोचविला. अन्यायाविरोधात अनेक मोर्चे, आंदोलने उभारत त्यांना न्यायाची भूमिका मांडली. प्रामाणिकपणे जनतेची सेवा केली. गावचे उपसरपंच ते पंचायत समिती सदस्य या पदांवर त्यांनी लोकांसाठी कार्य केले. त्यांच्या कार्याची परंपरा त्यांचे सुपुत्र कल्याण पोकळे यांनीही लहानपणापासूनच संघटनात्मक कामात सक्रिय राहून पुढे चालवली. वडिलांची सेवा करत त्यांनी तरुणांसमोर कर्तव्यनिष्ठेचा आदर्श उभा केला आहे असे सांगितले.

माजी आ. भीमसेन धोंडे म्हणाले की, स्वातंत्र्य सेनानी का. तात्यासाहेब पोकळे हे कम्युनिस्ट विचारात जगले. पंचायत समिती सदस्य असताना त्यांना आपण पाठींबा दिला होता. त्यांचा आमच्याशी खुप स्नेह होता. त्यांना ९८ वर्षांचे आयुष्य लाभले. कल्याण पोकळे देखील समाजाची सेवा करत आहे. तात्यासाहेबांच्या पाठीमागे लोकांच्या कामात कल्याण असतो.

माजी आ. साहेबराव दरेकर म्हणाले की, कम्युनिस्ट पक्ष हा वारकरी, पैशाला कधीच किंमत देत नाही.बोलताना देखील लाकूड मोडले असे सरळ बोलायचे. समाजाने संत परंपरेचा वसा घ्यावा तात्यासाहेब पोकळे आणि मी १२ वर्षे पंचायत समितीत सोबत काम केले आहे. आई वडिलांची



सेवा करणारीच माणसे मोठी झाली आहेत आसे सांगितले. यावेळी सुशीलाताई मोराळे, दादासाहेब मुंडे, आण्णासाहेब चौधरी, राम खाडे, डॉ. मधुकर हबर्डे, प्रविण घुले, बबनअण्णा झांबरे, अमोल तरटे, ह. भ. प. श्रीहरि पुरी महाराज, ह. भ. प. आदिनाथ आंधळे महाराज, एकनाथ गांगर्डे यांनी श्रध्दांजली अर्पण केली. दशक्रिया विधीस परमेश्वर शेळके, रमेश ढगे, प्राचार्य डा. हरिदास विधाते, माजी सरपंच बन्सीभाऊ पोकळे, अंकुश खोटे फौजी, डॉ. महेश नाथ, पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार प्रविण पोकळे, इंजि. प्रविण वारे, सरपंच तात्यासाहेब शिंदे, रामदास जगताप, संजय पोकळे, अमृत पोकळे, विक्रम पोकळे, आत्माराम फुंदे, रावसाहेब पोकळे, सदाशिव पोकळे, नवनाथ तांदळे, राधाकिसन पोकळे, हनुमंत शिंदे, हरिष हाथवटे, डॉ. श्रीनिवास पोकळे, मारुती पोकळे मामा आदि सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस. एच. पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४८०/२०२५**
**अनुसयाबाई विरूध्द निरंक**
**(मार्फत- ॲड.बी.एम.मुळे)**

ज्याअर्थी मयत नामे पांडुरंग पिता धाराजी भोजगुडे हे दिनांक १०/१२/२०२४ रोजी रा. कुंभारवाडी, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार १. अनुसयाबाई पांडुरंग भोजगुडे, वय ८७ वर्षे, धंदा शेती, रा. कुंभारवाडी, ता. गेवराई जि. बीड २. गणपत पिता पांडुरंग भोजगुडे, वय ५६ वर्षे धंदा घरकाम, रा. कुंभारवाडी, ता. गेवराई, जि. बीड ३. सुंदर पिता पांडुरंग भोजगुडे, वय ४७ वर्षे धंदा शेती, रा. कुंभारवाडी, ता. गेवराई, जि. बीड यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे पांडुरंग पिता धाराजी भोजगुडे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २४/०६/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ३०/०७/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर, गेवराई

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर, गेवराई

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायलयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५२१ / २०२५**
**भानुदास भिमा राठोड विरूध्द निरंक**
**(मार्फत एस. एल. मेघारे गेवराई)**

ज्याअर्थी मयत नवनाथ भानुदास राठोड हे / हया दिनांक १०/०५/२०२५. रोजी केकतपांगरी ता. गेवराई जि. बीड. येथे मयत झाले / झाल्या आहेत. अर्जदार १. भानुदास भिमा राठोड वय: ६० वर्षे, चंदा: शेती रा. रामनाईक तांडा, केकतपांगरी ता. गेवराई जि.बीड २. कांताबाई भानुदास राठोड वयः ५६ वर्षे, पंदा: शेती रा. सदर ३ प्रिया नवनाथ राठोड वय: २४ वर्षे धंदा शेती व घरकाम रा. सदर ४. हृदय नवनाथ राठोड वय: ० २वर्षे अ.पा.क. आई अर्जदार क्र. ३ प्रिया भ्र नवनाथ राठोडयांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे नवनाथ भानुदास राठोड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १७/०६/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०८/०८/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर, गेवराई

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर, गेवराई

पान १ वरून...

**उल्लेखनीय कार्य ...**

करण्याचा माझा प्रयत्न राहील. या योजनेच्या कामासाठी तालुकास्तरावर संगणक देण्यात येणार आहे. व्हाट्सअप चॅट अंतर्गत लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणी सोडण्यात येतील. यासाठी जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहे.

तर जलजीवन अंतर्गत पाणी पुरवठ्याच्या योजना पूर्ण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केला जाईल. ज्या काही एजन्सी ब्लॅक लिस्टमध्ये गेलेल्या आहेत त्याची चौकशी करण्यात येईल ज्यांनी कोणी या कामात भ्रष्टाचार केलेला असेल गैर उद्योग केलेले असतील त्यांना माफ केले जाणार नाही आणि आगामी काळात या कामांमध्ये सुधारणा करून कामे दर्जेदार करण्यावर माझा भर राहील.

त्याचबरोबर ग्रामपंचायत यांनी मतदाराच्या अडचणी दूर करण्यावर कसोशीने प्रयत्न केला पाहिजे यावर मी भर देणार आहे. नवीन पाणीपुरवठा योजनेला वीज जोडणी करण्यात येईल. ग्रामपंचायत आणि शाळा सक्षमीकरणासाठी प्रयत्न केले जाणार आहे. सरपंचांना पत्र लिहून त्यांच्या कामांना गती आणण्यासाठीचा प्रयत्न केला जाईल. जिल्हा तालुका आणि ग्राम स्तरावरील विविध योजना अधिक गतीने पूर्ण होण्यासाठी सर्वांचे सहकार्य घेतले जाईल.मागील पाच दिवसात बीड जिल्ह्यातील पाच पंचायत समितींना भेटी दिल्या आहेत. तर बीड तालुक्यातील वंजारवाडी आणि पेंडगाव येथील ग्रामपंचायत यांनी शाळेला आपण भेट दिली. वंजारवाडी येथील ग्रामपंचायतने विविध विकासाची कामे केली असून एक मॉडेल तयार केले आहे. वंजारवाडी ग्रामपंचायतच्या विकासात्मक कार्याचे त्यांनी कौतुक केले.

जिल्हा परिषदेच्या विविध विभागाला भेटी दिल्याचे सांगून जिल्हा परिषदेतील सर्वच विभागातील कामांना गती आणण्यासाठी प्रयत्न केला जाईल. इ संचिका मार्फतच कामकाज सुरू आहे. जिल्हा परिषदेतील प्रतिनियुक्ती संदर्भात चौकशी करून कारवाई करण्यात येईल. असे सांगून सर्वांना सोबत घेऊन आणि सर्वांच्या सहकार्याने काम करण्याचा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दिला.या पत्रकार परिषदेत प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

**धारूर तालुक्यातील ...**

धारूर तालुका हा डोंगरदऱ्यावर बसलेला आहे. वन विभागाचे मोठ्या प्रमाणात क्षेत्र असून या भागामध्ये विविध प्रकारची झाडे असून या झाडाचे संरक्षण वन विभागाच्या निगराणी मध्ये असताना ही वृक्षतोड तसेच चंदन तस्करी मोठ्या प्रमाणात होत आहे. याकडे वन विभाग लक्ष द्यायला तयार नाही. दिवसाढवळ्या तस्करी होत असेल तर यावर कारवाई का होत नाही यामागे दडले तरी काय असा प्रश्न पर्यावरण प्रेमी करत आहेत. तालुक्यातील गवंदरा येथे मागील चार दिवसाखाली चंदन तस्करी करणारे दिवसा ढवळ्या दुपारच्या वेळेमध्ये न कुणाला घाबरता कुंडलिका तलावातून गेलेला गावदरा शिवारातून गेलेला कॅनल परिसरातील चंदनाची तस्करी झाली असून याकडे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे.शेतकऱ्याच्या शेतामधील वृक्षतोड तसेच चंदनाचा गाभाकडून तस्करी करण्याचे प्रकारही सुरू असून याकडे वन विभागाचे दुर्लक्ष कसे काय यामागे अर्थकरण जोडले आहे की काय ? असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. तरी दिवसाढवळ्या चालणारा हा वृक्षतोड- चंदन तस्करीचा धंदा तात्काळ बंद करावा व अशा पर्यावरण नष्ट करणाऱ्या तस्करावर कडक कारवाई वनविभागाने करावी अशी मागणी धारूर तालुक्यातील पर्यावरण प्रेमी करत आहेत कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशाराही यावेळी तालुक्यातील नागरिकांनी दिला आहे.

**पाटोद्यात वंचित बहुजन ...**

त्यावर कठोर कारवाई यांचा समावेश होता. तसेच, पाटोदा तालुक्यातील दलित वस्तीतील सार्वजनिक बांधकामांची वेळोवेळी चौकशी करून भ्रष्टाचार रोखण्याची मागणीही आंदोलनकर्त्यांनी केली. या मागण्यांवर प्रशासनाकडून त्वरित लक्ष दिले जाण्याचे आदेश आंदोलनात नमूद करण्यात आले. तहसील कार्यालयाने आंदोलनाच्या निवेदनाची दखल घेत, संबंधित विभागांना पत्रे व स्मरणपत्रे पाठवून आवश्यक ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. काही प्रकरणांत वरिष्ठ कार्यालयाकडे समिती स्थापन करण्यासाठी पाठविण्याची तयारी असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. तहसीलदारांनी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांना चर्चेसाठी बोलावले असून, पुढील

पान १ वरून...

संवादातून प्रश्न सोडविण्याचा विश्वास व्यक्त करत आंदोलन शांततेत स्थगित करण्याचे आवाहन केले आहे.या आंदोलनात जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, दीपक थोरात, आप्पासाहेब देवडे, बळीराम ससाने, सतीश इनकर, सिद्धार्थ आगे, अमर वारभवन, महेश वाघमारे, राम पारखे आणि मोठ्या संख्येने महिला कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला.

**जालना कत्तलीसाठी डांबुन....**

ठिकाणी दि.२६/०६/२०२५ रोजी सायंकाळच्या सुमारास छापा मारला असता कुरेशी मोहल्ला येथे शकिल बासेद कुरेशी यांच्या वाड्यामध्ये १६ गोवंशीय जातीचे लाल, तांबड्या,काळ्या,पांढऱ्या रंगाचे बैल व गोऱ्हा असे एकूण २,४०,०००/- रुपये किंमतीचे १६ जनावरे डांबून ठेवण्याचे मिळून आल्याने सदरची गोवंशीय जनावरे हे ताब्यात घेऊन ते जनावरे गोरक्षण पांजरापोळ देऊळगावराजा रोड जालना या गोशाळेत ठेवण्यात आलेले आहे इसम नामे शकिल बासेद कुरेशी याच्या विरुद्ध पोलीस ठाणे कदीम जालना येथे प्राणी संरक्षण कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बन्सल,मा.अपर पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणी,मा.उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव, पोलीस निरीक्षक श्री माने, पोलीस उपनिरीक्षक श्री मोरे, पोलीस ठाणे कदीम जालना स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि.श्री योगेश उबाळे, पोलीस उपनिरीक्षक श्री राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार सॅम्युअल कांबळे, जगदीश बावने, दिपक घुगे, गोपाल गोशीक, कैलास खार्डे, विजय डिक्कर, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, संदीप चिंचोले, इर्शाद पटेल, किशोर पुंगळे, योगेश

पान १ वरून...

सहाने सर्व स्थानिक गुन्हे शाखा जालना व पोलीस ठाणे कदीम जालना येथील अंमलदार राठोड,भाले,बाबा गायकवाड,किरण चेके,शेख, अन्सारी, गायकवाड सर्व नेमणूक पोलीस ठाणे कदीम जालना व स्थानिक गुन्हे शाखा जालना यांनी सयुक्त कारवाई केली आहे.

**निवासी जिल्हाधिकारी...**

विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते २५ जून रोजी सन्मानपत्र, पेन, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येते. यावर्षी रविवार दिनांक २९ जून २०२५ रोजी बीड येथील स.मा. गर्गे भवन, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या जवळ, तुळजाई चौक,बीड येथे लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार आहे. असे जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष विकास स्वामी, सचिव वैभव स्वामी, उपाध्यक्ष सौ वैशाली स्वामी, सहसचिव सौ रुपाली स्वामी, कार्याध्यक्ष सौ वनमाला स्वामी, समन्वयक सौ वर्षा स्वामी, सदस्य शशांक स्वामी, वेदांत स्वामी तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त विलास स्वामी, अशोक स्वामी, दिलीप स्वामी, प्रशांत स्वामी, सतीश स्वामी, नागेश स्वामी, राजेश स्वामी आदींनी जाहीर केले आहे.

**बीड पोस्टल पतसंस्थेचे वीर,....**

केली. म्हणून सोसायटीचे अध्यक्ष विष्णू किसन वीर , उपाध्यक्ष संतोष दादाभाऊ सांगळे , सचिव अमरसिंग लखमीचंद ढाका यांना पाच वर्षाकरिता कुठल्याही पदावर राहता येणार नाही असे आदेश जिल्हा उपनिबंधक साहेब यांनी दिले आहेत. या निर्णयाने अपहार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.या निर्णयाचे बीड पतसंस्थेच्या सभासदांनी स्वागत केले आहे.

# भूसंपादन,पुनर्वसन यासह प्रलंबित रस्ता कामे,बांधरस्ते हद्दनिश्चिती आणि रोड रोमिओंचा बंदोबस्त करावा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यातील जनहिताची प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. विशेषतः खुंटेफळ साठवण तलावासाठी उर्वरित भूसंपादन आणि कुंभेफळ खुंटेफळ या दोन गावांचे पुनर्वसन, रस्त्यांची अपूर्ण कामे आणि बांधरस्ते ८ ते १२ फुटापर्यंत रस्ते रूंद करावेत. यासाठी अतिक्रमण असेल तर काढून टाकावे, शाळा महाविद्यालयांमधील विद्यार्थिनींच्या संरक्षणासाठी पोलिसांनी रोडरोमीयांचा बंदोबस्त करावा यासह अनेक विकास कामांबाबत आष्टी, पाटोदा आणि शिरूर (कासार) तालुक्यातील सर्व खाते प्रमुखांच्या बैठकीमध्ये आ. सुरेश धस यांनी कार्यवाही बाबत सक्त सूचना दिल्या आहेत. आष्टी तहसील कार्यालयामध्ये झालेल्या या बैठकीमध्ये ते बोलत होते.यावेळी उपविभागीय अधिकारी श्रीमती वसिमा शेख, आष्टी तहसीलदार वैशाली पाटील, तहसीलदार पाटोदा आणि तहसीलदार शिरूर कासार हे उपस्थित होते. सुरुवातीला माजी सैनिकांचे सर्व प्रश्न सोडवणे बाबत अंकुश खोटे



यांनी निवेदन दिल्यानंतर याबाबत चर्चा झाली, त्यावेळी माजी सैनिकांना मालमत्ता करा मध्ये सूट मिळणे बाबत असलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्यामुळे याबाबत लक्ष देण्याची मागणी केली. त्यावर उपविभागीय अधिकारी यांनी कार्यवाही सुरू असल्याचे सांगितले. खुंटेफळ साठवण तलाव अंतर्गत उर्वरित ४८० हेक्टर जमिनीची मोजणी पूर्ण करून खुंटेफळ, कुंभेफळ, सोलापूरवाडी येथील जमीन मोजणी पूर्ण झाल्यानंतर आराखडा तयार करून एकत्रित मोबदला वाटप करण्याच्या सूचना दिल्या. हा आराखडा ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डवर डकवण्यात यावा आणि संयुक्त मोजणी झाल्याचे स्पष्ट नमूद करण्यात यावे याबाबत उपविभागीय अधिकारी यांनी स्पष्ट सूचना दिल्या तसेच याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी बैठक घ्यावी असे सांगितले. तालुक्यातील दर्जेदार रस्ते निर्मिती झाल्यानंतर पाईपलाईन साठी रस्ते खोदण्यात येतात. त्याबाबत सर्व संबंधित शेतकऱ्यांना याबाबत नोटीसा देण्यात याव्यात. सिंदफणा प्रकल्पाची उंची वाढवणे तसेच उखळवाडी, जाधव वाडी प्रकल्प रखडलेले असून याबाबतची कारवाई तात्काळ करण्याची सूचना दिल्या तसेच आष्टी तालुक्यातील गहूखेल आणि ठोंबळ सांगवी या प्रकल्पाचे देखील लवकरच पूर्ण करावे. याबाबत सूचना दिल्या तसेच ग्रामीण भागातील बांध रस्ते हे आठ ते बारा फुटापर्यंत मंजूर करण्यात यावेत असा शासन निर्णय असून या रस्त्याच्या पूर्ण करण्यासाठी साठी पोलिसांचा बंदोबस घेण्यात यावा. प्रमुख जिल्हा मार्ग ग्रामीण मार्ग आणि राज्य रस्त्यांवर झालेले अतिक्रमणे दूर करावेत.

## बीड जिल्हा सहकारी पतसंस्थाचा सह संघ बीड , च्या अध्यक्ष पदी

# कचरू सारडा तर उपाध्यक्ष म्हणून राजू मोरे यांची बिनविरोध निवड



अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्हा सहकारी पतसंस्थाचा सहकारी संघ मर्यादित बीड मुख्यालय अंबाजोगाईच्या अध्यक्ष पदी श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेचे कचरू हिरालाल सारडा यांची अध्यक्ष पदी तर उपाध्यक्ष पदी राजश्री शाहू नागरी सहकारी पतसंस्थेचे मोरे राजू धनराज यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या संस्थेची पंचवार्षिक २०२५ ते २०३० साठीची निवडणूक दि ८ जून रोजी संपन्न झाली. १३ सदस्य असलेल्या जागांसाठी केवळ १३ उमेदवारांचेच अर्ज आल्यानं सदरील निवडणूक ही बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी संतोष भंडारी यांनी जाहीर केले.

बिनविरोध पणे निवडून आलेल्या सदस्यांमध्ये श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था अंबाजोगाईचे कचरू हिरालाल सारडा, सन्मति नागरी सहकारी पतसंस्था अंबाजोगाईचे देशमाने अरविंद शांतिकुमार, समर्थ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित माजलगावचे प्रभुणे उमेश रत्नाकर, राजश्री शाहू नागरि सहकारी पतसंस्था अंबाजोगाईचे मोरे राजू धनराज , अर्थवेल नागरी सहकारी पतसंस्था अंबाजोगाई चे माने बालासाहेब सोपानराव, आदर्श नागरि सहकारी पतसंस्था मर्यादित परळी वैजनाथचे सोळंके अमोल बालासाहेब, एस एन एस नागरी सहकारी पतसंस्था अंबाजोगाई चे कुलकर्णी विनायक भूजंगराव, श्री योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी सह पतसंस्थेचे मसने बालासाहेब काशिनाथ, नगर परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था अंबाजोगाई चे सातपुते संजय रतन, कै व्यंकटराव डावळे रुग्णालयीन कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे मोराळे नितीन बाजीराव, सावता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड चे राऊत किशोर महादेव, तसेच महिला गटातून वीज कामगार कर्मचारी सह पतसंस्था अंबाजोगाईच्या श्रीमती उषा रमेश तपसे आणि माहेश्वरी महिला नागरी सहकारी पतसंस्था माजलगाव च्या श्रीमती सोनाली सागर मानधने यांचा समावेश आहे.

सर्व नवनियुक्त सदस्यांची शुक्रवार दि २७ रोजी निवडणूक निर्णय अधिकारी संतोष भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन त्यांचातुनच सन २०२५ - २०३० साठी अध्यक्ष पदासाठी कचरू हिरालाल सारडा यांची संस्थेच्या अध्यक्ष पदी फेरनिवड केली आहे. तर उपाध्यक्ष म्हणून मोरे राजू धनराज यांची नियुक्ती करण्यात आली. संस्थेच्या या निवडणूकित अंबाजोगाई पिपल्स बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांची मोलाची भूमिका असल्याचे नवनियुक्त अध्यक्ष कचरू सारडा यांनी सांगितले. तसेच त्यांच्याच मार्गदर्शनाखाली यापुढेही आपण आपले कार्य करून बीड जिल्ह्यातील सर्व पतसंस्थाचे असलेले विविध प्रकारचे प्रश्न , अडचणी सोडवून ग्राहकांना अतिशय सुलभतेने सेवा देण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे देखील कचरू सारडा यांनी यावेळी नमूद केले.

बीड जिल्हा सहकारी पतसंस्थाचा सहकारी संघ मर्यादित बीड , मुख्यालय अंबाजोगाईच्या अध्यक्षपदी कचरू हिरालाल सारडा , उपाध्यक्ष मोरे राजू धनराज यांच्यासह सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे अंबाजोगाई पिपल्स बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी, कापूस पणन महासंघाचे संचालक ॲड विष्णुपंत सोळंके यांच्यासह प्रा वसंत चव्हाण यांच्यासह शैक्षणिक , सामाजिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रातून अभिनंदन व शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# केजच्या शनिमंदिराकडे जाणारा रस्ता नाली कामामुळे रस्ता दीड महिन्यापासून बंद

## नागरिकांना रहदारी साठी करावा लागतो दूरच्या रस्त्याच्या वापर



केज। प्रतिनिधी

केज शहरातील मंगळवार पेठेतून शनी मंदिर देशपांडे गल्ली, पाटील गल्ली सह केज शहरात जाणाऱ्या शनी मंदिर रस्ता नाली बांधकामामुळे गेल्या दीड महिन्यापासून बंद असल्याने नागरिकांना मानसिक त्रास सहन करण्यासोबतच वागण्यासाठी दूरच्या रस्त्याच्या वापर करावा लागत आहे मात्र याकडे नगरपंचायत अधिक्षक जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचे चित्र दिसून येत आहे.

केज शहरातील मंगळवार पेठ ही महत्त्वाची बाजारपेठ असून शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने या मंगळवार पेठेतून शहराच्या मध्यवर्ती भागात बालाजी मंदिर,स्वामी समर्थ मठ,पाटीलगल्ली, माळी गल्ली,देशपांडे गल्ली सह शहराच्या मध्यवर्ती भागात जाण्यासाठी मंगळवार पेठेतून शनी मंदिराकडे जाणारा प्रमुख जोड रस्ता गेल्या दीड महिन्यापूर्वी नालीचे काम करण्यासाठी खोदण्यात आला मात्र अद्याप ही नालीचे काम पूर्ण न करण्यात आल्याने हा रस्ता नागरिकांना रहदारी साठी पूर्णपणे बंद असल्याने नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे तर शहरातील दुसऱ्या भागासह लगत असलेल्या मंगळवार पेठेत जाण्यासाठी दूरच्या रस्त्याचा वापर करावा लागतअसल्याने नागरिकांतून नालीचे काम पूर्ण करून रस्ता वाहतुकीस खुला करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे मात्र याकडे नगर पंचायत जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

तसेच या रस्त्यालगत असलेल्या व्यावसायिकांच्या ही व्यवसायावर याचा परिणाम झाल्याने त्यांनाही आर्थिक झळ सहन करावी लागत आहे.त्यामुळे शनि मंदिराकडे जाणाऱ्या जोड रस्त्यावरील नालीचे काम नगर पंचायत केव्हा पूर्ण करणार असा संतप्त सवाल नागरिकांतून केला जात आहे.



# स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर चा अश्व रिंगणात भक्ती -विजय!

अंबाजोगाई (प्रतिनिधी )

अश्वरिंगणात विठू नामाच्या गजरात 'स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर'च्या चिमुकल्यांची अविस्मरणीय दिंडी! येथील योगेश्वरी महाविद्यालय मैदानावर दिनांक २६ जून २०२५ रोजी पार पडलेल्या भव्य अश्व अश्व रिंगण सोहळ्यात 'स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर'च्या विद्यार्थ्यांनी वारकरी वेशात विठ्ठलनामाच्या गजरात भक्तिमय दिंडीचे सादरीकरण सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

श्री संत चोखामेळा, नामदेव महाराज व संत जनाबाई पालखीच्या स्वागतार्थ आयोजिलेल्या या सोहळ्याला हजारो भाविकांची उपस्थिती लाभली होती. या भक्तिपूर्ण वातावरणात, 'स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर'च्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलात्मक आणि भक्तिभावपूर्ण दिंडीने उपस्थितांचे लक्ष वेधून घेत या स्पर्धेमध्ये इयत्ता पाचवी ते सातवी गटातील विद्यार्थ्यांनी भजन, नृत्य आणि घोष पथक यांचा मनोहारी संगम साधत प्रथम क्रमांक पटकावला. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी देखील प्रभावी सहभाग नोंदवत उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले.

या विजयी दिंडीचे नृत्यदिग्दर्शन संस्थेच्या सचिव व मुख्याध्यापिका श्रीमती स्वरूपाताई दिग्रसकर यांनी अत्यंत नेटकेपणे केले. त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी जे सादरीकरण सादर केले, त्याला अंबाजोगाईकर रसिकांनी भरभरून दाद दिली.या भव्य सोहळ्याचे स्वागताध्यक्ष आणि संयोजक मा. श्री .नंदकिशोर मुंडडा (काकाजी) यांनी ही या बाल चिमुकल्या वारकऱ्यांचे तोंड भरून कौतुक केले. त्यांनी अश्वरिंगणाच्या माध्यमातून वारकरी परंपरेचा तेजस्वी वारसा पुढे नेण्याचे कार्य केले. या अपूर्व यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. संतोष दादा कुलकर्णी, तसेच सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजयी विद्यार्थ्यांचे, संगीत संयोजकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे. सर्वत्र या वारकऱ्यांचे कौतुक होत आहे.

# आधार मल्टीस्टेटने केला पुरस्काराने गौरव ; गुणवंतांच्या पाठीवर दिली कौतुकाची थाप

## छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे प्रबोधनपर व्याख्यान



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील आधार मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने गुरूवारी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिन साजरा करून आर्थिक साक्षरता अभियान राबविण्यात आले. या पार्श्वभूमीवर डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे प्रबोधनपर व्याख्यान, विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मान तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला.हा समारंभ गुरूवार, दिनांक २६ जून २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता अंबाजोगाई येथे आधार मल्टीस्टेटच्या आधार भवन 'अजिंठा हॉल' मध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे माजी मराठी विभागप्रमुख तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे 'डॉ.बी.आर.आंबेडकर यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सणा प्रमाणे साजरी करा असे का म्हटले होते' या विषयावर अतिशय उद्बोधक व्याख्यान दिले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जेष्ठ साहित्यिक तथा खोलेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी भूषविले. या समारंभात समाजसेवा पुरस्कार - ॲड.संतोष पवार (आधार माणुसकीचा), उत्कृष्ट प्रशासन अधिकारी पुरस्कार - दीपक वजाळे (उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई), विद्याभूषण पुरस्कार - कार्डिओलॉजिस्ट डॉ.दीपक कटारे (अंबाजोगाई, लातूर) , उद्योगभूषण पुरस्कार - प्रकाश मर्लेचा (संचालक, प्रेरणा ड्रेसेस, अंबाजोगाई) यांना तर उत्कृष्ट साहित्य पुरस्कार - प्रा.डॉ.देविदास खोडेवाड (खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई) या मान्यवरांना प्रदान करण्यात आले. गुरूवार रोजी आधार मल्टीस्टेट अंबाजोगाई शाखेच्या नवव्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने हे विशेष उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते लोकराजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. स्वागतगीतानंतर प्रास्ताविक प्रा.डी.जी धाकडे यांनी केले. तर आधारचे चेअरमन ॲड.सुनील सौंदरमल यांनी मल्टीस्टेटचे कामकाज कसे चालते याविषयीचे 'प्रेझेंटेशन' सर्वांसमोर मांडले. मान्यवरांच्या स्वागतानंतर विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा विविध पुरस्कारांनी यथोचित सन्मान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह शाल, पुष्पहार आणि श्रीफळ असे होते. पुरस्कार प्राप्त ॲड.पवार व प्रा.डॉ.खोडेवाड यांनी समायोचित मनोगत व्यक्त केले. त्यानंतर आधार मल्टीस्टेटकडून क्रांती विकास एडके (कला शाखा खोलेश्वर महाविद्यालय), गायत्री प्रवीण दहिवाळ (९१ टक्के), वाणिज्य शाखा आदित्य शिवराज गुजर (८१ टक्के), विज्ञान शाखा वैष्णवी चाटे (८० टक्के), संध्या मस्के, अभिजीत कल्याण मुळे (९१ टक्के), आकांक्षा दत्तात्रय नरवटे (८८ टक्के) या गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन कौतुक व अभिनंदन करण्यात आले. त्यानंतर तब्बल दीड तास छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा संपूर्ण जीवनपट प्रा.डॉ.प्रल्हाद लुलेकर यांनी उलगडला. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.कांबळे यांनी केला. यावेळी मुक्त पत्रकार व साहित्यिक अमर हबीब, डॉ.राहुल धाकडे, दगडू लोमटे, धनराज काळे, लंकेश वेडे, भरत पतंगे, प्रा.डॉ.बाळासाहेब मुंडे, प्रा.पंडित कराड, ॲड.बाबुराव तिडके, ॲड.दिलीप गोरे, ॲड.माणिक गोरे, राजेंद्र घोडके, धोंडीराम जोगदंड, गणपत व्यास, रामकिसन मस्के, माणिकराव बावणे, कचरूलाल सारडा, चंद्रशेखर वडमारे, इंजि.अभिमन्यू चव्हाण, इंजि.विजयानंद बलाढ्ये, डॉ.सुरेश शेळके परभणी, शाखाधिकारी रवी पंडित (परभणी), प्रा.शिवाजी मांदळे, मुख्याध्यापक उषाताई मांदळे, सौ.लक्ष्मीबाई भोसले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. सुत्रसंचालन आधार मल्टीस्टेटचे अधिकारी अशोक डोंगरे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.सुरेश शेळके (परभणी) यांनी करून दिला. आणि उपस्थितांचे आभार मुख्यकार्यकारी अधिकारी विजय राऊत यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीकडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळच्या विद्यार्थ्यांना संगणक भेट




अंबाजोगाई (प्रतिनिधी)

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीकडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुंबेफळच्या विद्यार्थ्यांना संगणक भेट म्हणून देण्यात आला. 'मावळतीच्या सूर्याकडून हाच घ्यावा अर्थ, पुन्हा नव्याने उगवता येते. जर मनगटात असेल सामर्थ्य.' या उक्तीप्रमाणे आपला एक वर्षाचा कार्यकाल संपण्यासाठी अवघे दोन दिवस राहिलेले असताना रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचे अध्यक्ष व सचिव यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळच्या विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान मिळविण्यासाठी शुक्रवार, दिनांक २७ जुन रोजी संगणक भेट म्हणून दिले. हा (संगणक प्रणालीचे मॉडेल आणि कॉन्फिगरेशन - डेल ऑप्टीप्लेक्स ३०४०, आय ३, ८ जीबी रॅम, २५६ जीबी एसएसडी वायफाय) व डिस्ट्रिक्ट ग्रन्ड ३१३२ मधून १०० शाळेला १०० संगणक देण्यात आले. यात रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने जिल्हा परिषद शाळेचे कुंबेफळची निवड केली. रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांमध्ये काम करते. कुंबेफळ शाळेच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शिकण्याची जिद्द व शिक्षकांची शाळा व विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ पाहून रोटरी क्लबने शाळेस संगणक देऊन शैक्षणिक मदत केली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका हजारे व प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती विलासराव सोनवणे, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, कुंबेफळ गावचे सरपंच लिंगेश्वर तोडकर, माझी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व्यंकट किर्दन्त, ग्रामपंचायत सदस्य ओम यादव, हनुमंत कदम तसेच कुंबेफळ शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. या प्रसंगी रोटरीचे सचिव धनराज सोळंकी यांनी, 'शालेय शिस्त, गुणवत्ता, सर्व उपक्रमात विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग पाहून कुंबेफळच्या जिल्हा परिषद शाळेचे कौतुक केले.' तर यावेळी गावचे सरपंच लिंगेश्वर तोडकर यांनी संगणकासाठी यूपीएस देणार असल्याचे जाहीर केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती अंबुरे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार श्री.जिरगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी शाळेतील सहशिक्षक संतोष गायकवाड, डी.एम.कसबे, एम.एम.गायकवाड, श्रीमती एम.एम.तोडकर, श्रीमती एम.व्ही.मुंडे, श्रीमती एम.पी.सरवदे, श्रीमती पी.यु.जाधव, श्रीमती एन.आर.जाधव, गाताडे सर, एम.एन.गायकवाड यांनी पुढाकार घेतला.

# शासकीय आयटीआय कॉलेज धारूर येथे नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एन.एस.इ.)

मार्फतएक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम संपन्न




धारुर/प्रतिनिधी

दिनांक २५ जून २०२५ रोजी शासकीय आय टी आय कॉलेज धारूर येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एन एस इ) च्या माध्यमातून आय टी आय च्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवशीय स्मार्ट निवेक्षक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे आयोजन कॉलेजचे प्राचार्य विजय बेलेकर सर यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एन एस इ चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँकेत असलेल्या विविध योजना,तसेच पोस्ट ऑफिस मधील असलेल्या विविध योजना,डिमॅट अकाउंट, शेअर मार्केट,म्युच्युअल फंड व इतर शासकीय योजनांचे मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी ? व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन व्यवस्थित रित्या पार पडण्यास घोलक एस. व्ही,काळुंके के.जी, शेख जे.यु,शेख फाजी आदि सरांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन तथा आभार पी.एस.मुळे सर यांनी केले.या कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागतळा ते पंढरपूर दिंडीतील वारकऱ्यांना जगताप कॉफी सेंटरच्या वतीने थंड पेय व केळी वाटप

## ह. भ .प. महंत काशिनाथ महाराज यांचे स्वागत



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील जगताप बेकर्स, कॉफी अँड डेअरी फार्मच्या वतीने गणेश गड नागतळा ते पंढरपूर पायी दिंडी जाणाऱ्या वारकऱ्यांना थड पेय व केळी वाटप करण्याची सेवा केली आहे. याप्रसगी ह. भ. प. महंत काशिनाथ महाराज यांचे संचालक शुभम जगताप, शिवराज कोकणे व पत्रकार अविनाश कदम, अक्षय भोसले यांनी स्वागत केले. ही पायी दिंडी (वारी) भक्त पालखी, कीर्तन मंडळी आणि हजारो वारकऱ्यांच्या समूहासह नागतळा ते पंढरपूर (विठ्ठल मंदिर) या मार्गाने जाते. या प्रवासादरम्यान वारकऱ्यांना अन्न - पाणी, छाया, आरामाची सोय, औषधी सेवा इत्यादी देण्यासाठी अनेक संस्था, व्यावसायिक आणि भक्त सेवेचा हेतूने मदत करतात. या अनुषंगाने आष्टीतील जगताप बेकर्स, कॉफी अँड डेअरी फार्मच्या वतीने धार्मिक यात्रेला सामाजिक जबाबदारी म्हणून पाठिंबा देत आहे. त्यांच्या वतीने केले जाणारे वाटप थंड पेय व केळी हे भक्तांना ऊर्जा आणि उत्साह देण्यासाठी असते. धार्मिक समुदायाला सहाय्य करणे आणि सामाजिक सेवेची संस्कृती जिवंत ठेवणे गरजेचे आहे. यावेळी एन. टी. गर्जे, सर्जेराव तांबडे, विश्वनाथ गर्जे, रंगनाथ सानप, बाळू पालवे, ज्ञानदेव गर्जे, शेषेराव गर्जे, ननवरे सर, कृष्णा मिसाळ, शिवाजी शेकडे, उमेश तांदळे, प्रसाद खंडागळे, विनायक साबळे, ओमकार कोकणे, गणेश वाल्हेकर आदी उपस्थित होते.

# भारतीय स्टेट बँकेच्या वर्धापनदिनी सामाजिक उपक्रम : रक्तदान शिबिरात ४० जणांचे सहभाग




शिरूरकासार । प्रतिनिधी

भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया, शिरूरकासार शाखेने आपल्या ७० व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत विशेष उपक्रम म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन केले. मंगळवारी (ता.२४) पार पडलेल्या या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. एकूण ४० रक्तदात्यांनी रक्तदान करून माणुसकीचा संदेश दिला.

बँकेचे शाखा व्यवस्थापक प्रविण हासे यांच्या संकल्पनेतून आणि अर्पण रक्तपेढी, संगमनेर यांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वीरित्या पार पडले. उपप्रबंधक नागेश मंत्री, सहप्रबंधक विवेक पंडित, दिलीप सुटे, अनिकेत रामटेके, पंकज सिताबदार यांनी संयोजनात मोलाचे योगदान दिले. अर्पण रक्तपेढीच्या सुजाता वाकचौडे, जोगदंड, गडाख यांनी वैद्यकीय सेवा दिली.या वेळेस पत्रकार भारतकुमार पानसंबळ चंद्रकांत राजहंस यावेळेस त्यांचा शाखेकडून सत्कार करण्यात आला या उपक्रमात बँकेचे अधिकारी, कर्मचारी आणि ग्राहक हितचिंतक मोठ्या संख्येने सहभागी झाले. समाजाप्रती आपली जबाबदारी ओळखत एसबीआयने घेतलेला पुढाकार प्रेरणादायी ठरला.

# परळी न.पच्या अंतर्गत झालेल्या कामांची इ.स.२०१६ ते २५ वर्षातील श्वेतपत्रिका त्वरित जाहीर करा-बहादुरभाई

## शहरातील नदीवरील अतिक्रमण हटवासह विविध प्रश्नांवर परळी काँग्रेसचे निवेदन

न.प.प्रशासनाला काँग्रेसचने दिले १५ दिवसाचे अल्टिमेटम

परळी । प्रतिनिधी

झोपेचे सोंग घेऊन परळी नगर परिषद प्रशासन मुग गिळून करोडो रुपयांचा अफरातफर करत गिळंक्रत करत आहे याचे कारण म्हणजे काँग्रेस पक्षाच्या वतिने वारंवार श्वेतपत्रिका काढावी म्हणून निवेदने, आंदोलने केले परंतु अद्यापही श्वेतपत्रिका काढु शकली नाही यामुळे भ्रष्टाचाराचा संशय अधिक बळावला आहे.याच निवेदनाची पुन्हा आठवण म्हणून काँग्रेसच्या वतीने परळी नगर परिषदेला देण्यात आले असल्याचे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी यावेळी सांगितले.



दरम्यान शुक्रवार दि.२७ जुन रोजी परळी नगर परिषदेला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, न.प.प्रशासनाने २०१६ से २०२४ पर्यतची श्वेतपत्रिका आठ दिवसात प्रसिद्ध करावी, मागील दोन तीन वर्षा पासून आमच्या काँग्रेस पक्षा मार्फत अनेक निवेदन आपणास देण्यात आली जसे की, दुबार टेंडर ची चौकशी, झालेले कामाचे निवेदा काढून कोट्यावधी चे भ्रष्टचार बाबत चौकशी, कामाची गुणवत्ता बाबत, श्वेत पत्रिका प्रसिद्ध करणे बाबत, मनमानी कर मागे घेण्या बाबत, रोड, रास्ते, नाल्या, स्वच्छता, घरकूल, बाबत अनेक निवेदन देऊन सुद्धा एक ही कार्यवाही आपले कार्यालय मार्फत आज पर्यत पर्यंत केली नाही, किंवा त्या बाबत काही कारवाई दिसून येत नाही. डिसेंबर २०१६ ते मार्च २०२५ पर्यंतहची श्वेतपत्रिका दि.५ जुन २०२५ पूर्वीची प्रसिद्ध करावी, पक्षाचे अनेक निवेदन आपल्या कार्यालयात पडून आहे त्यावर कार्यवाही करावी अन्यथा आपण भ्रष्टचाराचे पाठराखण करीत असल्याने आपल्या भूमिकेचे परळी शहर काँग्रेस च्या वतीने दि.दि.५ जुन २०२५ नंतर तिव्र आंदोलन आपल्या कार्यलय समोर करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे.तसेच परळी शहरातील सरस्वती नदीवरील, अतिक्रमण तत्काळ हटवणे, मुस्लिम कबरस्थान जवळील आपण केलेले नाला चे नालीत रूपांतर पुन नाल्यात करणे, शादी खाना ते सरस्वती नदी दरम्यान असलेली घाण तत्काळ काढणे व शादीखाना परिसरातील अतिक्रमण ताबडतोब हटवणे अदी बाबत निवेदन देण्यात आले याच बरोबर आहे.न.प.प्रशासनाला काँग्रेसने १५ दिवसाचे अल्टिमेटम देत आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे. या निवेदनावर शशी चौधरी,इतेशाम खातिब,वैजनाथ गडेकर,दीपक सिरसाट,रुसुल खान, बद्दर भाई, गफारशा, गित्ते इत्यादीच्या स्वाक्षरी आहेत.



## महंत गणेशानंद महाराज यांच्या पायी दिंडीचा आष्टीत मुक्काम

आष्टी । प्रतिनिधी

श्री जगदंबा खडेश्वरी देवस्थानचे ह. भ. प. महंत गणेशानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली नजीक चिंचोली ते पंढरपूर पायी दिंडीचा शुक्रवार दि. २७ जुन २०२५ रोजीचा आष्टी शहरात ह. भ. प. शिवाजी महाराज बिडवे यांच्या निवासस्थानी मुक्काम झाला. श्री क्षेत्र नजिक चिंचोली येथुन श्री जगदंबा खडेश्वरी मातेच्या कृपेने सर्व साधुसंतांच्या आशीर्वादाने ह. भ. प. महंत गणेशानंद महाराज यांचे मार्गदर्शनाखाली वै. सुखदेवभाऊ महाराज धाडगे यांचे प्रेरणेने जगदंबेची पालखी आषाढी वारीसाठी निघाली आहे. पालखी प्रस्थान श्री जगदंबा मंदिरामधुन सोमवार दि. २३ जुन रोजी २०२५ झाले आहे. दिंडी चालक ह. भ. प. शिवाजी महाराज पाठक, बाबुराव चावरे, ईश्वर पाठक, भाऊसाहेब चावरे, अशोकराव चौघुले, ह. भ. प. बाबासाहेब महाराज धाडगे, दिंडी व्यवस्थापक सरपंच शिवाजी लक्ष्मण पाठक, चेअरमन केशव विधाटे, पत्रकार महेश औताडे आदि महाराज सहभागी झाले आहेत. ही दिंडी शाहापूर, देडगांव, ढोरजळगांव, आव्हाणे, पाथर्डी, चेकेवाडी, धामणगाव, खिळद, केरुळ,आष्टी, पारगाव, निंबोडी, डाकु निमगाव, जातेगांव, करमाळा, निंभोरा, दहिवली, कन्हेरगाव, परिते, भोसे,षटाकळी व पंढरपूर या मार्गाने जाणार आहे. आष्टी शहरात शुक्रवार दि. २७ जुन रोजी पत्रकार उत्तम बोडखे यांच्या घरी नाष्टा तर ह. भ. प. शिवाजी बिडवे महाराज यांच्याकडे मुक्काम रात्रीचे भोजन व कीर्तन होणार आहे.



## छत्रपती राजर्षी शाहू महाराज कर्ते सुधारक आणि समाज उद्धारक होते - डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड

केज । प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज.जि.बीड येथे २६ जुन २०२५ रोजी लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती व्याख्यान कार्यक्रमाने साजरी करण्यात आली.प्रमुख व्याख्याते म्हणून दादासाहेब गायकवाड यांचे छोटेखानी व्याख्यान संपन्न झाले.प्रमुख पाहुणे म्हणून रावसाहेब जाधव, रामराजे गायकवाड, राजाभाऊ बोडके, बाबासाहेब शिंदे यांची उपस्थिती होती.अध्यक्षीय समारोप ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते,परखड व्याख्याते डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे कर्ते समाजसुधारक व समाज उध्दारक होते असे प्रतिपादन अध्यक्षीय समारोप करताना डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.सर्वप्रथम छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेलापुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.

# बीड जिल्ह्यातील तीन आंबेडकरवादी योद्ध्यांचा छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार देऊन सन्मान

केज । प्रतिनिधी

अण्णाभाऊ साठे पिपल्स फोर्सचे संस्थापक अध्यक्ष बा.रा.वाघमारे सर यांच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळीत योगदानाबद्दल महाराष्ट्रा तील ५० मान्यवरांना दि.२६ जून २०२५रोजी पुरस्कृत करण्यात आले.आंबेडकरवादी योद्ध्यांचा सत्कारआणि भव्य पुरस्कार वितरण सोहळा रुबी हॉटेल नवीन नांदेड सिडको येथे पार पडला.अनेक नामवंत मान्यवरांच्या हस्ते छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार सन्मान पूर्वक देण्यात आला.

बीड येथील आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश घोडे यानात्याच्या आंबेडकरवादी चळवळी बद्दल हा पुरस्कार देण्यात आला. महाराष्ट्रामध्ये खरी आंबेडकरी चळवळ चालवणारा ध्येयवेढा तरुण म्हणून ते परिचित आहेत.आंबेडकरवादी चळवळ पुढे घेऊन जाण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रामध्ये ठिकठिकाणी तरुणांची एक वेगळीच सेना तयार केलेली आहे.या सेनेच्या माध्यमातून मागास,वंचित,अन्याय अत्याचारग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी वेगाने तत्पर असतात. त्यांच्या कार्याचा यथोचित



सन्मान नांदेड येथील अण्णाभाऊसाठे पीपल्स फोर्सच्या माध्यमातून करण्यात आला.खऱ्या आंबेडकरवादी योद्धाचा सत्कार झाला अशी चर्चा आज महाराष्ट्रातून उमटतआहे.त्याचप्रमाणे बीड येथील दुसरे सामाजिक कार्यकर्ते बाबूराव केशवराव गालफाडे सर यांनाही छत्रपती राजश्री शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार देण्यात आला.बाबुराव गालफाडे सर सध्या केज येथे वास्तव्यास असून दलितांवरील अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात.त्यांच्या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात. समाजातील यशवंताचा प्रोत्साहनपर सत्कार असो,की एखाद्या अडचणीत सापडलेल्या व्यक्तीला मदतकरण्याचे कार्य असो,प्रत्येक ठिकाणी त्यांचा हिरीरीने सहभाग असतो. समाजातील अनेक संघटनांचे व पक्षांचे ते सल्लागार म्हणून काम करतात.अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्सच्या माध्यमातून छत्रपती राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार देऊन त्यांचोहीयथोचित सन्मान करण्यात आला

पुरस्काराचे बीडचे तिसरे मानकरी डॉ. लक्ष्मण वाघमारे यांनाही हा पुरस्कार देण्यात आला.समाजसेवा, शिक्षण,सामाजिकन्याय आणि मानवतावादी विचारांद्वारे आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे महाराष्ट्रा तील ज्येष्ठ नेते आणि श्रमिक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. लक्ष्मण मरीबा वाघमारे यांना हा गौरव केवळ एका व्यक्तीचा नव्हे,तर संपूर्ण समाजाचा, कुटुंबाचा आणि महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीचा सन्मान असल्याचे मत अनेक मान्यवरांनी व्यक्त केले. हा सन्मान म्हणजे डॉ. वाघमारे यांच्या दीर्घ कालीन सातत्यपूर्ण कार्याचा प्रामाणिक पणाचा,सामाजिक बांधिलकीचा आणि शिक्षण व ज्ञान क्षेत्रा तील भरीव योगदानाचा सन्मान होय.या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पँथर चळवळीचे नेते रमेशभाई खंडागळे, उद्घाटक म्हणून सामाजिक बाधिलकीचे जाणकार बालाजी नवघरे शिरसिकर, स्वागत अध्यक्ष म्हणून भीम कायदा संघटना जिल्हाध्यक्ष विलास दादा गजभरे,कार्याध्यक्ष म्हणून अण्णाभाऊ साठे पीपल्स फोर्स चे संस्थापक अध्यक्ष बा.रा.वाघमारे सर यांच्या उपस्थितीमध्ये हा पुरस्कार वितरणाचा सोहळा पार पडला.

अण्णाभाऊ साठे पिपल्स फोर्सचे संस्थापक बा.रा. वाघमारे मातंग समाजा तील एक अभ्यासू व त्यागी नेते आहेत. कांशीराम यांचे कार्य ते पुढे नेत आहेत.मातंग समाजासह सर्व बहुजन बांधवांना संघटित करण्यासाठी तेअहोरात्र कष्ट घेत आहेत.नवीन नांदेड सिडको येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त विदर्भ आणि मराठवाड्यातील काही निवडक बुद्धिजीवी व आंबेडकरवादी कार्यकर्त्यांना छत्रपती राजश्री शाहू महाराज समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.या प्रसंगी अण्णाभाऊ साठे पिपल्स फोर्सचे संस्थापक अध्यक्ष बा.रा वाघमारे यांनी जी काही भूमिका आपल्या भाषणातून मांडलेली भूमिका निश्चित समाधानकारक व सर्वांच्या हिताची होती, म्हणून समाज बांधवांनी बा.रा वाघमारे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे मत प्रतिक्रिया देताना आरंभ वृत्तपत्राचे प्रतिनिधी पी.डी.कसबे यांनी व्यक्त केली.

# सोलापूरवाडी येथे शासकीय कृषी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी प्रयत्न करू - आ.सुरेश धस यांची ग्वाही

आष्टी । प्रतिनिधी

सोलापूर वाडी येथे माळरानावरील कोरडवाहू जमिनीमध्ये सेंद्रिय खते आणि नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करत प्रयत्नांची पराकाष्ठा करून फळबाग फुलवलेल्या इन्फॉर्मेशन अँड टेक्नॉलॉजी या विषयातील इंजिनीयर हनुमंत लक्ष्मण गावडे यांना महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक कृषी पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आमदार सुरेश धस आणि सौभाग्यवती प्राजक्ता धस यांनी सोलापूर वाडी येथे जाऊन त्यांचा सपत्नीक सत्कार केला. त्याप्रसंगी त्यांनी हनुमंत गावडे यांनी नवीन तंत्रज्ञान आणि ऑरगॅनिक पद्धतीचे पीएम बायोटेक या प्रॉडक्ट्स द्वारे विक्रमी उत्पादन घेऊन ड्रॅगन फ्रुट सफरचंद आणि सीताफळ या फळ पिकांचे विक्रमी उत्पादन घेतले घेतले आहे. या तंत्रज्ञानाचा तालुक्यातील इतर प्रगतिशील शेतकऱ्यांनी प्रेरणा घेऊन त्यांना उत्तम पद्धतीचे प्रशिक्षण देण्यासाठी सोलापूर वाडी येथे शासकीय कृषी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही आमदार सुरेश धस यांनी दिली.

यावेळी आ. सुरेश धस आणि त्यांच्या सौभाग्यवती प्राजक्ता धस यांनी या फळबागेमध्ये जाऊन ड्रॅगन फ्रुट च्या तोडणी शुभारंभ केला. यावेळी परिसरातील शेतकऱ्यांचा परिसंवाद मेळावा घेऊन हनुमंत गावडे यांनी कोरडवाहू असलेल्या शेतीवर शेततळे तयार करून कमी पाण्यावर नवीन तंत्रज्ञान आणि ऑरगॅनिक पद्धतीचे पीएम बायोटेक चे प्रॉडक्ट असलेले खते वापरून सर्वसाधारणपणे ड्रॅगन फ्रुट आणि सफरचंद यांचे मागील वर्षीपेक्षा पाचपट उत्पन्न घेतल्यामुळे या नवीन तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना व्हावी यासाठी प्रशिक्षण केंद्र सुरू करू अशी ग्वाही आमदार सुरेश धस यांनी दिली आणि शेतकऱ्यांना संबोधित करताना आधुनिक व तांत्रिक शेतीची कास धरून प्रगतीचा मार्ग कसा साधावा याचे उदाहरण म्हणजे हनुमंत गावडे असून त्यांच्याकडून नवीन शेतकऱ्यांनी आदर्श आणि प्रेरणा घ्यावी असे आवाहन करताना त्यांनी सेंद्रिय शेती ही एक काळाची गरज असून मानवी आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सेंद्रिय शेतीकडे सर्वांनी वळले पाहिजे आणि त्यातून दर्जेदार उत्पन्नाची शाश्वती निर्माण केली पाहिजे. याबाबत उपस्थित शेतकऱ्यांना संबोधित केले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी गोरक्ष तरटे यांनी सेंद्रिय शेती कशी करावी व त्यासाठी कोणत्या प्रकारचे प्रॉडक्ट शेतीमध्ये वापरावेत जेणेकरून शेतीचा ऑरगॅनिक कर्ब आणि एनपीके चा बॅलन्स साधला जाईल, याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पीएम बायोटेक प्रॉडक्ट्स व्यवस्थापकीय संचालक महेश माने यांनी पीएम बायोटेकच्या प्रॉडक्ट्स ची सविस्तर माहिती देऊन ऑरगॅनिक खते वापरल्यामुळे फळांचा आकार आणि वजन वाढते आणि बाजारामध्ये टिकून राहण्याचे तंत्र आणि गुणवत्ता याची माहिती दिली. याप्रसंगी हनुमंत गावडे यांनी सत्काराला उत्तर देताना शेती हा एक सर्वात मोठा व्यवसाय आहे, असे सांगत एक एकर ड्रॅगन मध्ये वीस लाख रुपये चे उत्पन्न कसे मिळवले याची तांत्रिक माहिती दिली. यावेळी महाराष्ट्र राज्य दूध सहकारी महासंघ महानंद मुंबईच्या संचालिका प्राजक्ताताई धस, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, पीएम बायोटेक चे व्यवस्थापकीय संचालक महेश माने, माऊली जरांगे, मंडळ कृषी अधिकारी प्रमोद कुडाळे, धानोरा मंडळातील सर्वच कृषी सहाय्यक गौतम आजबे, दवा गव्हाणे, रावसाहेब भस्मे, महेबूब फौजी बाळासाहेब थोरवे, सुनीलथोरवे, योगेश शेळके सरपंच सुंबेवाडी, राजू खुरांगे सरपंच धनगरवाडी, राजू अल्हाडे बाळेवाडी, रामदास शेंडगे, मल्हारी थोरवे, राहुल काकडे, नवनाथ जगताप, बाबासाहेब मुठे, बबन गार्डे, आजिनाथ गव्हाणे, अशोक थोरवे उपसरपंच सोलापूरवाडी, भास्कर घोडे, प्रमोद थोरवे, दत्तात्रय थोरवे यांचेसह परिसरातील





## पुरोहित कल्याणसमिती च्या प्रदेश अध्यक्षपदी श्रीनिवास केजकर यांची निवड

केज । प्रतिनिधी

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती च्या माध्यमातून वेगवेगळे सामाजिक आंदोलने व उपक्रम राबविण्यात आली आहेत त्यामुळे महाराष्ट्रात अमृत सारखी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये सहकार्य होत आहे तसेच परशुराम आर्थिक विकास महामंडळ ब्राह्मण समाजासाठी निर्माण करण्यात आले. या आंदोलनात नेहमी अग्रेसर असणारे श्रीनिवास केजकर यांची समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती च्या पुरोहित कल्याण समितीच्या प्रदेश अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीही ब्राह्मण समाजातील वेगवेगळ्या समस्यावर मागील १० ते १२ वर्षांपासून काम करत आली आहे. ब्राह्मण समाजातील पुरोहित बांधवांच्या समस्या सोडविण्या साठी व पुरोहितांसाठी संघर्ष समितीच्या माध्यमातून काम करण्यासाठी श्रीनिवास केजकर यांची निवड करण्यात आली आहे.

संघर्ष समिती महाराष्ट्र राज्यात संघटनात्मक बांधणी करत असून लवकरच राज्य विभाग जिल्ह्यात व तालुका पातळीवरच्या नियुक्ती करून सामाजिक उपक्रम राबविणार असल्याचे समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीचे संस्थापक धनंजय कुलकर्णी, श्रीकांत जोशी,ईश्वर दीक्षित यांनी सांगितले. दरम्यान श्रीनिवास केजकर यांच्या निवडी चे पत्र ब्राह्मण संघर्ष समितीचे संस्थापक धनंजय कुलकर्णी, अनंत देवा कोकिळ, श्रीधर नाना खोत, चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले आहे.त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.

# अंबाजोगाई नगरपरीषदेवर शहर विकास संघर्ष समितीचा मोर्चा धडकला

## नागरी सुविधा व इतर गंभीर समस्यांकडे निवेदनातून लक्ष वेधले

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

नागरी सुविधा, घरकुले, भोगवटा मालमत्ता मालकी हक्कांत घेणे व इतर गंभीर समस्यांची सोडवणूक करा यासह एकूण सहा मागण्यांचे निवेदन मुख्याधिकारी यांना देत शहर विकास संघर्ष समितीचा मोर्चा शुक्रवारी अंबाजोगाई नगरपरीषदेवर धडकला.

शहर विकास संघर्ष समितीच्या वतीने नागरी सुविधा, घरकुले, भोगवटा मालमत्ता मालकी हक्कांत घेणे व इतर गंभीर समस्यांची सोडवणूक करा यासह एकूण सहा मागण्यांचे निवेदन मुख्याधिकारी यांना शुक्रवार, दिनांक २७ जुन रोजी देण्यात आले. सदरील निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या शहरात निवारा व भोगवटा




मालकी हक्क या बाबत अनेक वर्षांपासून जनता आंदोलन करीत आहे, हे प्रश्न अद्याप ही कायमचे सुटलेले नाहीत, नगरपरिषदची कौन्सिल नसल्याच्या कालखंडात मुख्याधिकारी यांच्या नियंत्रणात शहरात अनेक कामे जनतेच्या पैशाचा अपहार करणारी झालेली आहेत, त्याची चौकशी करणे आवश्यक आहे, आम्ही खालील मुद्यांसाठी आज आंदोलन करीत आहोत, मागण्या अशा १) सर्व झोपडपट्टी विभागात घरकुलांचा लाभ द्या, २) भोगवट्याची घरे मालकी हक्कांत घ्या, ३) शहरात न.प.ची जुनी दुकाने व्यक्तीगत मालकी हक्कांप्रमाणे नाममात्र भाड्याने दिलेली आहेत, त्या सर्व दुकानांचा लिलाव करा, दर पाच वर्षांनी व्यापारी संकुलातील दुकाने लिलावात काढा, ४) शहरातील पाणी पुरवठा सर्वांत वाईट आहे, तो नियमीत करा, ५) पावसाळ्यात स्वच्छता मोहीम कायम राबवा आणि ६) आपल्या काळात व्यापारी हेतूसाठी झालेली अतिक्रमणे ताबडतोब निष्कासीत करा या मागण्यांवर आपण येत्या आठ दिवसांत तात्काळ अंमल केला नाही. तर परत तीव्र आंदोलन केले जाईल याची नोंद घ्यावी. असा इशारा शहर विकास संघर्ष समितीने दिला आहे. मुख्याधिकारी मागण्यांचे निवेदन स्वीकारले. तर नगरपरिषदेच्या मिटींग हॉलमध्ये मुख्याधिकारी प्रियांका टोंगे व नगरपालिका अधिकारी यांच्यासोबत झालेल्या चर्चेत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ.बब्रुवाहन पोटभरे, भिमशक्ती संघटनेचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख, हमीद चौधरी, यशोधन लोमटे, लोकजनशक्ती पार्टी (रा) युवाचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे शहराध्यक्ष असेफोद्दीन खतीब, अभिजीत लोमटे, ऍड.इस्माईल गवळी, विनोद शिंदे, बाबा शेख, प्रेम माने, मनिष आदमाने, संतोष पारधे, विशाल पोटभरे, लोकजनशक्ती पार्टी (रा) युवाचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक काळे, केज तालुकाध्यक्ष गंगाधर पौळ, प्रदीप गुंडरे, दिनेश घार, अझहर शेख अकबर शेख, आदित्य चौरे, करण तेलंग, सुजित मुसळे, कैलास मस्के, सागर मिरगुडे, शुभम तरकसे, सुमित आवाडे, संकेत तरकसे, अविनाश मोरे, रोहन आवडे, धीरज आवाडे, शुभम भोसले, राम मोरे, सागर किर्दंत, चिकू जोगदंड यांच्यासह विविध पक्ष आणि संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सहभाग घेतला.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# महाराणी ताराबाई विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर यांचा सेवापुर्तीचा निरोप समारंभ सत्कार सोहळा संपन्न

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य डी.डी.राऊत सर यांचा सेवापुर्ती निमित्त निरोप समारंभ सत्कार सोहळा रेणुका माता मंदिर देवस्थान,वडवणी या ठिकाणी महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने संपन्न. याबाबत अधिक माहिती अशी की,वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य डी.डी.राऊत सर यांनी ३४ वर्ष प्रदीर्घ ज्ञानदानाच पवित्र कार्य करून नियत वयोमानानुसार संस्थेच्या प्रदीर्घ सेवेतून दि.३१ मे २०२५ रोजी ते सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने सेवापूर्तीच्या निमित्त सपत्नीक सत्कार व निरोप समारंभ सोहळ्याचा कार्यक्रम गुरुवार दि.२६ जून २०२५ रोजी रेणुका माता मंदिर देवस्थान वडवणी या ठिकाणी आयोजित करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तर प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा परिषदेचे उपशिक्षणाधिकारी मा. नानाभाऊ हजारे ,तसेच वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती तथा संस्कार शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.अनिलदादा चोले,, उपनगराध्यक्ष मा.बन्सीभाऊ मुंडे,संस्थेचे माजी अध्यक्ष राजेभाऊ वारे,भाजपा वडवणी तालुका अध्यक्ष सुखदेव बप्पा रेडे,ह.भ.प.आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री,ह.भ.प.दुटाळ महाराज,शिवसेना तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे,माजी सभापती प्रशांत बापू सावंत,सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रकाश पाटील सर, केंद्र प्रमुख सुरेश करांडे सर, सावंत सर,डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष तथा दै.डोंगरचा राजा साप्ताहिकाचे संपादक अनिल भाऊ वाघमारे,दै. लोकमानस साप्ताहिकाचे संपादक सतीशजी वाघमारे,दै. गदर साप्ताहिकाचे संपादक ड.ज्ञानेश्वर लंगे,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई बीड जिल्हाध्यक्ष ड.विनायकजी जाधव,विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजयभाऊ आंधळे, संचालक पांडुरंगजी अंडील,संचालक रणजीत भैय्या धस,युवा मोर्चा तालुकाध्यक्ष ईश्वरजी तांबडे,डॉ.खोटे,शाळेच्या संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे, विद्यालयाच्या नुतन प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे- डोईफोडे मॅडम,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर आदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते.



सर्वप्रथम मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कुमारी प्रीती तुरुकझाडे हिना आपले विचार व्यक्त केले .तसेच श्री. डोईफोडे सर,श्री.पाटील सर तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे सेवापूर्ती सत्कार सोहळ्याच्या अनुषंगाने आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर सत्कारमूर्ती श्री.राऊत सर व सौ.राऊत मॅडम यांचा फार शाल व सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्ती प्राचार्य राऊत सर यांनी सत्काराला उत्तर दिले त्यानंतर अध्यक्षीय समारोपर विचार माजी आमदार केशवदादा आंधळे साहेब यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक उपप्राचार्य मस्के सर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.अंडील जी.पी.,सौ. प्रियंका कुरकुटे मॅडम यांनी केले व उपस्थितांचे आभार पर्यवेक्षक धाईतिडक सर यांनी मानले.या कार्यक्रमाची सांगता साने गुरुजी यांच्या खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने झाली. त्यानंतर रुचकर भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यालयातील विद्यार्थी शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच युवराज शिंदे,पत्रकार जगदीश गोरे,पत्रकार ज्ञानेश्वर वाव्हळ,पत्रकार अविनाश मुजमुले,पत्रकार शंकर झाडे, पत्रकार अर्जुन मुंडे,पत्रकार सोनवणे,पत्रकार विष्णू डोईफोडे , कैलास भुजबळ,यांच्यासह पालक,राजकीय,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राऊत सरांचे या महाराणी ताराबाई संकुलावर फार उपकार आहेत हे विसरुन चालनार नाही,त्यांनी या पूढेही त्यांनी आपली शाळा समजुन सहकार्य करावे.

-मा.आ.केशवराव आंधळे

राऊत सर म्हणजे एक प्रमाणिक,सच्चा,व कामाचा माणूस त्यांनी घड्याळाच्या काट्याकडे पाहुन कधिच काम केले नाही, जादा वेळ दिला तेव्हाच शाळेला व संस्थेला चांगले दिवस पाहवयास मीळाले .

मा.नानाभाऊ हजारे
उपशिक्षणाधिकारी जि.प.बीड

माझी ओळख ही मी स्वतः निर्माण केलेली नसुन ही मा.आ.केशवराव आंधळेदादा यांनी पाठीवर टाकलेल्या शाब्बासकिचाच परीणाम , महाराणी ताराबाई शाळेचा एक शिक्षक हीच माझी ओळख.

प्राचार्य राऊत डी.डी.

## मुख्यमंत्री सौरकृषीवाहिनी योजनेची कामे निर्धारीत वेळेत पुर्ण करा – कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर



### लातूर,धाराशिव व बीड मंडळातील कामांचा घेतला आढावा

लातूर ।प्रतिनिधी

महावितरणचे कार्यकारी संचालक ( वितरण ) श्री दत्तात्रय पडळकर यांनी आज (दि.२७ जून) लातूर परिमंडळातील मुख्यमंत्री सौरकृषीवाहिनी २.० या महत्वाकांक्षी योजनेच्या कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना व कंत्राटदारांना निर्धारित वेळेत कामे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.विद्युतभवन येथे पार पडलेल्या या बैठकीत सौरकृषीवाहिनी २.० योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विविध कामांची सविस्तर माहिती घेतली.पडळकर यांनी झालेल्या कामांच्या प्रगतीचा आढावा घेत असताना,

शेतकऱ्यांना वेळेत आणि अखंडित वीजपुरवठा मिळावा यासाठी सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण होणे आवश्यक असल्याचे सांगितले.यावेळी लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले, अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी, बीड मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रेमसिंग राजपूत, धाराशिव मंडळाचे अधीक्षक अभियंता संजय आडे तसेच सर्व विभागाचे कार्यकारी अभियंता, तसेच संबंधित कंत्राटदार उपस्थित होते. श्री. पडळकर यांनी कामाच्या गुणवत्तेवर भर देत, उपकेंद्रामधील पॉवर ट्रान्सफॉर्मर, रोहीत्रांची क्षमतावाढ, बे व ब्रेकरची कामे कसलीही कारणे न सांगता वेळेत पुर्ण करण्याच्या सुचना करत, याकामी कोणतीही अडचण आल्यास तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे निर्देश दिले. त्याचबरोबर वेळोवेळी सुचना देवूनही ज्या एजन्सी कामात दिरंगाई करत आहेत त्यांच्या सेवा समाप्त करण्याचे आदेश दिले. मुख्यमंत्री सौरकृषीवाहिनी २.० या योजनेमुळे लातूर, बीड व धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिवसा सातत्याने वीज मिळणार असून, शेतीच्या उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल, असा विश्वास श्री. पडळकर यांनी यावेळी व्यक्त केला.

याप्रसंगी वीजबील वसुलीचा आढावा घेत वीजबील वसुलीची कार्यक्षमता वाढवण्याकरिता काही मौलिक सुचना केल्या. प्रत्येक जनमित्रांनी दररोज किमान १० ते १५ रिसीप्ट जमा केल्या तर वेळेच्या आत वीजबील वसुलीचे लक्ष्य साध्य होईल असे निर्देश दिले. बैठकीनंतर कार्यकारी संचालक-२ श्री पडळकर यांनी बर्दापूर व पळशी येथील सौरकृषीवाहिनी २.० च्या प्रकल्पांनर भेट देत झालेल्या कामांची पाहणी केली.

## बंजारा समाजाचे धर्मगुरू बाबुसिंग महाराजांबद्दल आक्षेपार्ह विधान केल्या प्रकरणी

### अंबाजोगाई पो.स्टे.ला गुन्हा दाखल करा म्हणून निवेदन

अंबाजोगाई /सुनिल सिरसाट

बंजारा समाजाची काशी समजल्या जाणाऱ्या पोहरादेवी येथील संत सेवालाल महाराज यांच्या गादीवर असलेले त्यांचेच वंशज धर्मगुरू मठाधिपती बाबूसिंग महाराज यांच्या विषयी गोरसेनेचा पदाधिकारी संदेश चव्हाण याने अत्यंत खालच्या पातळीवरील भाषेमध्ये जाऊन आक्षेपार्ह लिखाण केल्याने त्याच्या विरोधात गुन्हा दाखल व्हावा म्हणून संपूर्ण राज्यभरात नव्हे तर देशभरात जागोजाग निवेदन देण्यात आले. याच अनुषंगाने अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन मध्येही गुन्हा नोंदवा म्हणून निवेदन देण्यात आले.



केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशभरात धर्मगुरू महाराजांना मानणारा खूप मोठा वर्ग आहे. बाबुसिंग महाराज हे बंजारा समाजासाठी केवळ संत व अलीकडच्या काळातील आमदार तथा राजकीय प्रतिनिधी नसून महाराज हे आज बंजारा समाजाच्या अस्मितेचा प्रश्न आहे. एवढेच नव्हे तर ते बंजारा समाजाचा आत्मा आहेत. तेंव्हा बंजारा समाजासह इतरही समाजाचा अत्यंत श्रद्धेचा भाग असणाऱ्या बाबुसिंग महाराजांविषयी तथाकदीत गोरसेना प्रमुख संदेश चव्हाण रा.हनतखेड, ता.सिंदखेडराजा, जि.बुलढाणा येथील माथेफिरू ने वैयक्तिक आकसापोटी आपल्या काही टपोरी सहकाऱ्यांना सोबत घेऊन बंजारा समाजाचे धर्मगुरू बाबुसिंग महाराजांच्या विरोधात अतिशय खालच्या थराला जात अश्लाघ्य भाषेत शिव्या देत बदनामीकारक मजकूर वापरून फेसबुक-इंस्टाग्राम- व्हाट्सअप-ट्विटरवरती अत्यंत मानहानिकारक लिखाण करून महाराजांची बदनामी होईल आणि समाजामध्ये मोठा असंतोष निर्माण होईल असे लिखाण करून समाजात द्वेष भावना पसरणारे काम काम केल्याने बंजारा समाजाने एकमुखाने अशा महामूर्ख माणसावरती जागोजाग गुन्हा दाखल होऊन त्याच्या शांतता भंग करणाऱ्या कृत्यामुळे त्याला आयुष्यभराची अद्दल घडावी म्हणून महाराष्ट्रासह देशभरात निवेदन देण्यात आले. पुणे येथील येरवड्यात संतश्रेष्ठ सेवालाल महाराज यांचा पुतळा बसून याकरिता तथाकथित गोरसेना प्रमुख संदेश चव्हाण याने काही बोटावर मोजण्या इतपत साथीदारांना सोबत घेऊन बंजारा समाजातील लोकांकडून मोठ्या प्रमाणात निधी गोळा केला आणि मग निधी गोळा करून रोज त्यातील काही निधी संदेश चव्हाण व त्याच्या सहकाऱ्यांच्या वैयक्तिक मौजमजा आणि इतर वाह्यात कामासाठी खर्चीला जात असल्याने काही चांगल्या विचारधारेच्या बंजारा समाजातील कार्यकर्त्यांनी ही धार्मिक बाब धर्मगुरू बाबुसिंग महाराजांच्या कानावरती घातल्याने महाराजांनी त्याला समज देण्याचा प्रयत्न केला. आणि संतश्रेष्ठ सेवालाल महाराजांचा पुतळा बसवता येत नाही. कारण ते एक संत होते, ईश्वरी अवतार होते. पुतळा बसवल्यास भविष्यात पुतळ्यांची विटंबना होऊ शकते वा काही समाजकंटक मंडळी जाणीवपूर्वक विटंबना करतात. आणि मग अशा समाज विघातक कार्यावरून मग केवळ एखाद्या गावात, राज्यात नाही तर देशभरात दंगे-मारामारी-जाळपोळी सह अनेक बेकायदेशीर दुष्कृत्ये केली जातात. मग स्व:समाजासह इतर समाजातही असंतोष निर्माण होईल अशा घटना घडतात. तेंव्हा संतश्रेष्ठ सेवालाल महाराजांचे समाधीस्थळ-मंदिर असावे. परंतु पुतळा नसावा एवढाच मौलिक धार्मिक सल्ला धर्मगुरू या नात्याने मा.आ.बाबुसिंग महाराजांनी माथेफिरू संदेश चव्हाण यास दिल्याने त्यास तो आवडला नाही तथा पचला नाही. कारण त्यामुळे अवैध निधी गोळा करण्याचे काम थांबणार होते. आणि मग रोजच्या ऐशोआरामालाही ब्रेक लागणार असल्याने संदेश चव्हाण याने निधी गोळा करण्याचे काम सुरूच ठेवले. मग धर्मगुरू या नात्याने सांगूनही चव्हाण यांनी आपला मनमानी कारभार सुरूच ठेवल्याने अखेर समाजाचे श्रद्धेय बाबूसिंग महाराजांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची तात्काळ भेट घेऊन सारा प्रकार लक्षात आणून देऊन संतश्रेष्ठ सेवालाल महाराजांचा पुतळा उभारणीस तात्काळ स्थगिती दिल्याने तथाकथित गोरसेना प्रमुख संदेश चव्हाण याच्या सर्वच नियोजनावर पाणी फेरल्याने त्याने धर्मागुरु बाबुसिंग महाराजांच्या विषयीचा प्रचंड राग मनात धरून आपल्याच प्रवृत्तीचे काही साथीदार-सहकारी सोबत घेऊन सोशल मीडियातील सर्व प्रकारात महाराजांविषयी अत्यंत खालच्या पातळीवर लिखाण करत महाराष्ट्रासह देशभरातील बंजारा समाजाच्या अस्मितेला धक्का पोहोचेल असे वर्तन केल्याने बंजारा समाजासह वंजारी-धनगर-हटकर- माळी-कोळी-दलित बांधव यांच्यासह अठरापगड जातीतील ओबीसी बांधवांनी तर असंख्य मराठा-ब्राह्मण बांधवांनी एकत्रित येत माथेफिरू संदेश चव्हाण याच्या विरोधात अखंड हिंदूराष्ट्र संघटनेचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष तथा भाजपा ग्रामविकास पंचायतराज समिती विभागाचे मराठवाडा सह-संयोजक तथा नरेंद्र मोदी विचार मंचाचे बीड जिल्ह्याचे अध्यक्ष तथा श्री. बागेश्वर धाम समिती बीड जिल्हा सचिव आणि पत्रकार असलेल्या सुनील सिरसाट यांच्या नेतृत्वाखाली बंजारा समाजाचे प्रमुख कार्यकर्ते चैनु आडे व अरुण चव्हाण यांनी खझड/इछड आणि खढ -र्ली मधील तरतुदीनुसार खझडउख५३-, २९५-, ५००, ५०४, ५०५(२), व खढ -र्ली ६६-, ६७ व ईतर आवश्यक त्या कलमानुसार गुन्हा नोंद करून सर्व संबंधितांवर तात्काळ कठोरात कठोर कारवाई करून संबंधितास अटक करावी ही मागणी केली आहे.

निवेदनावर श्रीभैय्या कुलकर्णी, अबोद कुलकर्णी, अमोल कुलकर्णी, शेपवाडी ग्रा.पं.सदस्य अंगद शेप, माजी उपसरपंच बालासाहेब शेप, बन्सी चव्हाण, बाबाराव शेप, संजय चव्हाण, विघ्नेय राठोड, दशरथ जाधव, अनिल राठोड, संतोष चव्हाण, व्यंकटेश देशमुख, संतराम चव्हाण, रोहन पानखडे, रमेश आडे, अनिकेत बनसोडे, वैभव गिरी, अभय कुर्डे, अजय शिंदे, रोहित धिमधिमे, राहुल देवकर, ओम चव्हाण, सोमेश्वर चव्हाण, अमित चव्हाण, यांच्या सह्या असून त्यांच्यासह इतरही बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## राजर्षी शाहुजी महाराज हे उपेक्षित, वंचितांचे लोकनायक आहेत – डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

महात्मा फुले स्मारक समिती अंबाजोगाई तर्फे छत्रपती राजर्षी शाहूजी महाराज यांची १५१ वी जयंती मोठ्या उत्साहात स्मारक समिती नगरात साजरी करण्यात आली. यावेळी विचारमंचावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाला प्रमुख व्याख्याता म्हणून खोलेश्वर महाविद्यालयाचे उपप्राचार्य लेखक विचारवंत प्रा.गौतम गायकवाड यांची उपस्थिती होती.

### शाहू महाराजांचे लोककल्याणकारी राज्य आजचे राज्यकर्ते का निर्माण करू शकत नाहीत – प्रा.गौतम गायकवाड



कार्यक्रमाची सुरूवात छत्रपती शाहूजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली. प्रमुख व्याख्याते उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांनी बोलताना छत्रपती शाहू महाराज यांचा जीवन कार्य उलगडून दाखवत असताना त्याचे अनेक पैलू आजच्या सामाजिक परिस्थिती मध्ये लागू कसे करता येतील यावर विचार मंथन केले. छत्रपती राजर्षी शाहू महाराज व घटनाकार संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे परस्पर संबंध कसे होते. याचा उहापोह उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांनी केला. छत्रपती शाहू महाराजांच्या लोककल्याणकारी राज्यात सर्व प्रजा सुखी होती समाधानी होते शेतकरी आनंदाने जगत होता. मात्र आजची राजकीय परिस्थिती सामाजिक परिस्थिती पाहीली तर सर्वत्र हातास चित्र दिसत आहे सर्वसामान्य जनता महागाईने त्रस्त झालेली आहे जाती धर्मांच्या देशामुळे भारत हे अखंड राष्ट्र फुटीच्या मार्गावर जात आहे. की, काय अशी शंका येत आहे छत्रपती शाहू महाराजांनी तसे लोक कल्याणकारी राज्य उभारले तसे आजच्या राज्यकर्त्यांना ते राज्य उभा करणे का जमत नाही.? असा सवाल उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड यांनी केला. आपले अध्यक्षीय समारोपपर मनोगत व्यक्त करताना डॉ.राजेश इंगोले यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, शेती, अर्थ विषयक विचार हे सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार करून केलेले होते. छत्रपती शाहू महाराजांनी वंचित, उपेक्षित वर्गांना सामाजिक मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण ही संकल्पना राबविली. त्याच संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचे काम घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. छत्रपती शाहू महाराजांचा स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय हा विचार घटनेमध्ये प्रामुख्याने जाणवतो. छत्रपती शाहू महाराजांच्या अलौकिक कार्य केवळ सर्वसामान्य वंचित उपेक्षित घटकांसाठी होते. त्यामुळे छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने 'वंचितांचे लोकनायक' होते असे गौरवोद्गार डॉ.राजेश इंगोले यांनी केले. समितीचे कार्यकारी अध्यक्ष बी.के.मसने यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या जीवनामध्ये रयतेला महत्त्वाचे स्थान दिले होते त्यामुळे त्यांना लोकर्षी म्हणतात असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमच्या यशस्वितेसाठी महात्मा फुले स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, कार्यकारी अध्यक्ष बी.के.मसने, उपाध्यक्ष रामेश्वर खाडे, सचिव रत्नदीप गोरे, कोषाध्यक्ष संजय साळवे, डॉ.मिलिंद ढगे, संघटक सुनिल नरसिंगे, भाऊराव गवळी तसेच राजकुमार साळवी, प्रा.आदित्य कदम, प्रा.तुषार करपुडे, हेमंत धानोरकर, ताटे, किरण नरसिंगे, यांनी परिश्रम घेतले. यावेळी डॉ.कमलाकर राऊत, भीमाशंकर शिंदे, कलढेले, प्रा.राहुल सुरवसे, नितीन सरवदे, अजिंक्य बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बारावी परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या कु.स्नेहा साळवे तसेच कु.वैष्णवी काळे या गुणवंतांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.किरण चक्रे, तर पाहुण्यांचा परिचय गणेश कदम यांनी करून दिला, सूत्रसंचालन प्रा.अनिल नरसिंगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.मिलिंद ढगे यांनी मानले.



## रयतेचे राजे छत्रपती शाहू महाराज सदा सर्वकाळ वंदनीय आहेत –संतोष डोंगरे

धम्मदीप बुद्ध विहार व वाचाल तर वाचालवाचनालयातर्फे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन

बीड ।प्रतिनिधी

बहुजनांचा उद्धार शिक्षणाशिवाय होणार नाही हे विद्या विना मती गेली..' हे क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांच्या थोर विचारांची आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे व बहुजन हिताय बहुजन सुखाय या मूलमंत्र्यानुसार राज्यकारभार करणारे रयतेचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज सदा सर्वकाळ वंदनीय आहेत असे उद्गार सुप्रसिद्ध कीर्तनकार व संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे गाढे अभ्यासक प्रमुख वक्ते संतोष डोंगरे सर यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना संबोधितांना प्रतिपादन केले.

धम्मदीप बुद्ध विहार बीड येथे बुद्ध विहार कमिटी, वाचाल तर वाचाल वाचनालयातर्फे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विनम्र अभिवादन कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष म्हणून महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जीएम भोले सर हे होते तर ह. भ. प. श्रीकृष्ण उबाळे सर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. या कार्यक्रमास वाचाल तर वाचालचे संस्थापक अध्यक्ष डी जी वानखेडे, समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले, आयु. बि जी दळवी, डीएम राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम तथागत, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती राजश्री शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले,ड तेजस वडमारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्ताविक करून बुद्ध विहारे हे संस्कार केंद्र व्हावीत या दिशेने पुढील वाटचाल राहील असे निर्धारपूर्वक सांगितले.

वरील निर्धारचाच एक भाग म्हणून वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाने बलभीम नगर परिसरातील १२ गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य( वही पेन) व छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती शाहू महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले,माता रमाई,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, संत गाडगेबाबा थोर शास्त्रज्ञ डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांचे जीवन चरित्र पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला तर वाचनालयाचे केंद्र असलेल्या ३८ वे केंद्र असलेले धम्मदीप बुद्ध विहार परिसरातील विद्यार्थ्यांकरीता ४ थ्या फेरीतील ५० पुस्तकांचा संच ३ महिने वाचनाकरिता ड तेजस वडमारे यांना मान्यवरांच्या हस्ते मुलांना वितरित करण्याकरिता सुपूर्द करण्यात आला.नवनिर्वाचित नौकरिस रुजू झालेले सय्यद शबनम रफिक व अभिजित सिरसाट यांचा पेन महापुरुषांचे जीवन चरित्र पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन धम्मदीप बुद्ध विहार व वाचनालयातर्फे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.याप्रसंगी छोटी बालिका तनिष्का वाघमारे हिने बाबासाहेबांच्या जीवनावर मंत्रमुग्ध करणारे सुरेल आवाजात गीत गायले याबद्दल अध्यक्ष जीएम भोले यांनी तिला ५० रुपये बक्षीस देऊन पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या. या सत्कार प्रसंगी नवनियुक्तांनी आपले मनोगत व्यक्त करून आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून चिकाटीने अभ्यास केल्यास यश नक्की मिळते असे भाओद्गार काढले, प्रमुख पाहुणे ह भ. प. श्रीकृष्ण उबाळे महाराज यांनी छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांच्या जीवनात बहुजन हिताकरिता केलेल्या अनेक कार्यावर सखोल प्रकाश टाकून महाराजांच्या जीवनाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सध्या स्थिती जीवनाची वाटचाल ठेवणे हेच त्यांना जयंतीदिनी खरे विनम्र अभिवादन ठरेल असे स्पष्ट केले या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन निळकंठ (केके) वडमारे यांनी केले त्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्व उपस्थित ४० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) व खाऊ वाटप केले. या कार्यक्रमास आयु.राज जाधव, प्रेम जोगदंड,यश गवळी, सरिता खेमाडे, कोमल वाघमारे, अंजली वडमारे व बलभीम नगर, शिवाजीनगर, मित्र नगर, पंचशील नगर, परिसरातील बालक बालिका व उपासक उपासिका मोठया संख्येने उपस्थित होते, राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# वक्फ संरक्षण शिष्टमंडळाची मुस्लिम उलेमा, विद्वान, विचारवंतांची घेतली भेट

परतूर / तारेख शेख

वक्फ संशोधन बिल निषेधार्थ बैठकीसाठी जालना जिल्हा आणि परिसरातील विद्वान, राजकीय आणि सामाजिक व्यक्तींसोबत बैठका सुरू आहेत. आज जालना येथील पूरक मुस्लिम वैयक्तिक कायदा मंडळाच्या प्रतिनिधीं मंडळाने परतूर येथे बैठक घेतली आणि २८ जून रोजी सायंकाळी जालना शहरात होणाऱ्या ऑल इंडिया मुस्लिम पर्सनलला बोर्डाच्या बैठकीची माहिती दिली.



मौलाना नसरुल्ला हुसैनी उर्फ मौलाना सोहेल नदवी यांनी सांगितले की, मुस्लिम वैयक्तिक कायदा मंडळाच्या प्रतिनिधी पक्षाच्या नियमानुसार वक्फ संशोधन,बिल या सध्याच्या भारतीय सरकारच्या काळ्या कायद्या विरुद्ध आम्ही संघर्ष करत आहोत. मुस्लिम समाजातील विद्वान, नेते आणि मुस्लिम वैयक्तिक कायदा मंडळाच्या नेत्यांनी या बैठकीला उपस्थित राहून इस्लामिक उम्मा असल्याचे महत्त्व सिद्ध करावेत. असे आवाहन मौलाना सोहेल नदवी यांनी उपस्थितांना संबोधित करताना केले.ते पुढे बोलताना म्हणाले, की आपले जीवन, मालमत्ता, मान आणि धर्म धोक्यात आलेले आहेत.अश्या परिक्षेच्या वेळी आपण गप्प राहावे का? आज आपले धार्मिक मुल्ये ही आपल्याकडून हिरावून घेतले जात आहे. आपल्या मशिदी हिरावून घेतल्या जात आहेत. मदरसे, शाळा आणि कब्रस्तानांवर बोटे उचलली जात आहेत. सरकारने त्यांच्यावर ताबा मिळवण्याचा अधिकार हिसकावून घेण्यासाठी संसदेत वक्फ संशोधन विधेयक मंजूर केलेला आहे. यासर्व प्रश्नांवर सख़ोल चर्चा व मार्गदर्शन करण्यासाठी जालना शहरात २८ तारखेला मुस्लिम पर्सनल ला बोर्डाची एक भव्य बैठक शहरातील ईदगाह मैदानावर होत आहे, ज्यामध्ये मुस्लिम पर्सनल ला बोर्डाचे अध्यक्ष मौलाना खालिद सैफुल्लाह रहमानी, मौलाना उमरैन महफूज नोमानी, आणि इतर विद्वान आणि प्रतिष्ठित मान्यवर लोक सहभागी होत आहेत. ही बैठक संध्याकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत चालेल. अशी माहिती मौलाना सोहेल नदवी यांनी दिली आहे. ही बैठक महबूब सुभानी मस्जिद परतूर येथे झाली. यावेळी मौलाना इसाखान काशफी, मास्टर इजाज , मास्टर इस्माईल यांनीही उपस्थितांना या बैठकी बद्दल माहिती दिली. जालना येथील शिष्टमंडळात मौलाना सोहेल नदवी, इस्माईल सर, इजाज सर, मौलाना इसा खान काशफी, शाकीर सर, आदींचा समावेश होता.या बैठकीस अयुब खान पठाण, अधिवक्ता जहूरोद्दीन कादरी, कय्युम खान पठाण, अर्शद सिद्दिकी, मौलाना अकील कासमी, हाफिज मुजफ्फर मिल्ली, हाफिज फय्याज, कारीसाहब, परतूर शहरातील विद्वान आणि प्रतिष्ठित लोक सहभागी झाले होते. मौलाना सोहेल यांच्या प्रार्थनेने बैठक संपली.

## अंबड पोलीस ठाण्याचे डी बी पथकाने विधी संघर्ष बालकाकडून


# चार जिवंत काडतूस पिस्टल व धारधार तलवार केली जप्त

अंबड ।प्रतिनिधी

दि.२६ जून रोजी अंबड पोलीस ठाण्याचे डी बी पथक १०.वाजेच्या सुमारास राणी उंचेगाव भागात अवैध धंद्यावर कारवाई व माहिती काढण्याकरिता गस्त करीत असतांना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की राणी उंचेगाव भागात एक नवीन ईसम आलेला असून त्याच्या जवळ धारधार तलवार व कमरेला पिस्टल असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली असता डी बी पथकाने पोलीस ठाणे अंबड चे प्रभारी पोलीस अधिकारी श्री संतोष घोडके व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विशाल खांबे यांना व वरिष्ठांना माहिती दिली पोलीस निरीक्षक श्री संतोष घोडके व उपविभागीय अधिकारी श्री विशाल खांबे यांच्या व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाप्रमाणे सदर संशयित ईसमास डी बी पथकाचे पोउपनि.भगवान नरोडे,पोहेकॉ.यशवंत मुंढे,पोहेकॉ.दिपक पाटील व पोशि.अरुण मुंढे यांनी त्या संशयित ईसमास ताब्यात घेऊन त्याची चौकशी व झाडाझडती घेतली असता त्याच्याकडून एक सिल्वर रंगाची पिस्तूल चार काडतूस व एक धारधार तलवार मिळून आल्याने त्याला ताब्यात घेण्यात आले त्याच्या त्याबाबत खात्री केली असता तो विधी संघर्ष बालक असल्याचे दिसून आले आहे



त्याच्यावर अंबड पोलीस ठाण्यात गु.र.नं.३४२/२०२५ कलम ३/२५ व ४/२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे जप्त केलेली पिस्टल कोठून व कोणाकडून खरेदी केली याबाबत पुढील तपास अंबड पोलीस करीत आहे.सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बन्सल,मा.अपर पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विशाल खांबे यांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे पोलीस ठाणे अंबड चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री संतोष घोडके, पोलीस उपनिरीक्षक भगवान नरोडे,पोहेकॉ.यशवंत मुंढे,पोहेकॉ.दिपक पाटील,पोशि.अरुण मुंढे यांनी केली आहे.



# अंबड शहरात चोरट्यांचा धुमाकूळ

अंबड ।प्रतिनिधी

शहरातील ओमशांतीनगर लगत असलेल्या शमीम कॉलनी, फैसलाबाद कॉलनीमध्ये चोरट्याने धुमाकूळ घालत चार घर फोडले. यात सोन्याचांदीचे दागिने व रोख रकमेवर डल्ला मारला. ही घटना गुरुवारी (ता. २६) पहाटे घडली. शमीम कॉलनी चोरट्यांनी तीन घर फोडले. यात मोसंबीचे व्यापारी नशीर बागवान यांचे घर फोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. घरातील कपाटामध्ये ठेवलेले साडेतेरा तोळ्यांचे सोन्याचे दागिने व २३ तोळे चांदीचे दागिने व रोख चार लाख वीस हजार रुपयांवर डल्ला मारला आहे. याच भागात अनिता सुरेश जाधव यांच्या घरातील दोन तोळे सोने,

चार ग्रॅमची सोन्याची नथ, सहा ग्रॅमची नथ, सोन्याचा एक ग्रॅमचा दागिना, पायातील चार तोळ्यांचे चांदीचे चैन, चांदीचे जोडव्याचे दोन नग चोरून नेले. तर शनो शकील कुरेशी यांचे दीड ग्रॅम वजनाचे कानातील झुंबर, पंधरा ग्रॅमचे सेव्हनपिस, पंधरा ग्रॅमची सोन्याची नथ व घरातील रोख चाळीस हजार रुपये चोरीला गेले आहेत. फैसलाबाद येथील इम्रान गफार शेख यांच्या घरातील रोख सात हजार रुपयांवर चोरट्यांनी डल्ला मारला. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान, याबाबत माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. श्वान पथक, फिंगर प्रिंट पथकासही बोलाविण्यात आले होते.

## इंजिनीयर म्हणतो गाय गोठा बांधा बांधल्यावर म्हणतो शासन

# नियमाप्रमाणे बांधला नाही

पाली ।प्रतिनिधी

सध्या सर्वत्र महाराष्ट्रभर शेतकऱ्यांसाठी रोजगार हमी योजनेतून मागेल त्याला गाय गोठा अशी शासनाची योजना आहे, पण ती मंजूर करण्यासाठी पंचायत समितीला गेल्यावर पैसे मोजावे लागतात तेव्हाच ते गाय गोटा मंजूर होतो.मंजूर झाल्यावर एक वर्ष दीड वर्ष दोन वर्ष वर्क ऑर्डर निघून बी इंजिनिअर तो काही शेतकऱ्याकडे येत नाही शेतकऱ्याला पुन्हा म्हणावं लागतं साहेब माझं गाय गोठा मंजूर झाला आहे जिओ टॉकिंग ला या इंजिनीयर म्हणतो मला काम आहे नंतर येतो असं म्हणता वर्ष लोटत. पुन्हा शेतकरी इंजिनिअर साहेब कवा येतील पंचायत समितीला येतो पण इंजिनिअर साहेब वेळ मिळत नाही मग ते आपल्या हाताखालच्या लोकांना जिओ लॉगिन साठी टाकण्यासाठी पाठवतात नंतर रोजगार सेवक व इंजिनिअर साहेबांचा असिस्टंट जिओ टॉकिंग करून देतात हे करण्यासाठी शेतकऱ्याला पैसे मोजावे लागतात त्यासाठी जिओ टर्निंग झाले का नाही हे बी सांगत नाहीत साहेबाला भेटा पुन्हा असे सांगून पुन्हा ते जातो . पुन्हा शेतकरी इंजिनिअर कडे गेल्यावर गाय गोटा बांधा असे म्हणलयावर शेतकरी येतो गाय गोठा बांधून घेतो मात्र तपासणीसाठी खाजगी असिस्टंट इंजिनिअरिंगनी मी पाठवून दिलेला असतो तो म्हणतो तुम्ही शासन नियमाप्रमाणे गाय गोठा बांधलेला नाही तुम्हाला पुन्हा गाय गोटा बांधावा लागेल नसता खर्च करावा लागेल असे सांगितले जाते तेव्हा शेतकऱ्यांनी अगोदरच गाय गोटा बनवण्यासाठी पैसा खर्च केलेला असतो. तेव्हा शेतकरी म्हणतो ठीक आहे जाऊ द्या देतो तेव्हा कुठे गाय गोट्याचे कुशल इंजिनीयर कडून काढण्याचे हालचाली सुरू होतात. पण अगोदर त्या शेतकऱ्याला शासन नियमाप्रमाणे गाय गोठा बांधावा लागेल असे सांगितले जात नाही फक्त तुम्ही गाय गोठा बांधा असे सांगितले जाते. तर काही शेतकऱ्यांनी शासन निर्णय प्रमाणे गाय गोठा बांधला तरी इंजिनीयर ऑफिशियल कार्यालयात पैसे मोजावेच लागतात त्या शिव्या (बिल) कुशल निघत नाही. तुम्ही खरं करा खोटं करा तुम्हाला पैसे मोजावेच लागतात.

# अकोला स्मशान भूमीत वृक्षा रोपण

बदनापूर ।प्रतिनिधी

मा आ. श्री नारायण कुचे ,व शिवसेना जिल्हाप्रमुख श्री भाऊसाहेब घुगे आणि ग्राम पंचायत कार्यालय अकोला यांच्या विशेष प्रयत्नातून ग्रामपंचायत अकोला येथे नवीन स्मशान भूमीचे अद्यावत कामकाज करण्यात आलेले आहे. सदर स्मशान भूमीवर अकोला गावाचे भूमी पुत्र, सेवा निवृत्त पोलीस अधिकारी श्री बळीराम गिते यांच्या तर्फे आज दिनाक २७/६/२५ रोजी वड ,पिंपळ,नारळ,लिंब.बकान,गुलमोहर आशा विविध प्रकारची सावली देणाऱ्या वृक्षाची लागवड ग्रामस्थांचा मदतीने सदर स्मशान भूमीत करण्यात आली आहे. यावेळी अकोला गावचे सरपंच श्री महादू गीते,उपसरपंच दत्ताभाऊ तांबे,दिनकर नागरे,राजूभाऊ थोरात,माजी सरपंच गणपत केकान,मुख्याध्यापक गजानन डोईफोडे,संजय काकडे,बाजीराव नागरे,नारायण सुराशे बालाजी कोरडे संजय शिंदे नागेश, तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्राम विकास अधिकारी श्री चापायतकर , तसेच गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते



## ऑलिम्पिक स्पर्धेत खेळाडूंनी अधिकाधिक सहभाग नोंदवावा- प्रा.शेळके



बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी ऑलिम्पिक स्पर्धेत सहभाग नोंदवावा,असे मत शिवछत्रपत्री राज्य क्रीडा पुरस्कारार्थी प्रा. जे. पी. शेळके यांनी व्यक्त केले. जागतिक ऑलिम्पिक दिन जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे नुकताच (ता.२३) रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शेळके बोलत होते. या कार्यक्रमास जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, जेष्ठ क्रीडा संघटीका जया बारगजे, श्री. अफरोज, श्री. पठाण, नितीन गर्जे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले तर आभार क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील यांनी मानले

# अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे मुलींना मोफत पास फॉर्मचे वितरण

जालना ।प्रतिनिधी

अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जालना आगार तर्फे राबविण्यात येत असलेले मानव विकास मिशन अंतर्गते ८ ते १२ पर्यंत ग्रामीण भागातील मुलींना शहरातील विद्यालयात व महाविद्यालयांमध्ये येण्याकरिता मोफत पासेस देण्यात येत आहे.जालना शहरातील अंकुशराव टोपे कनिष्ठ महाविद्यालयातील ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शहरात येण्यासाठी मोफत पासची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जालना आगारातील वाहतूक निरीक्षक श्री. एम. एस. शेख तसेच वाहतूक नियंत्रण श्री. एस.डी. हातागळे यांनी आज मोफत पास फॉर्म उपलब्ध करून दिले.

यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.पांडुरंग खोजे,श्री. एम.एस.शेख,श्री.एस.डी. हातागळे यांच्या हस्ते मुलींना मोफत पास फॉर्मचे वितरण करण्यात आले. यावेळी डॉ.अनिरुद्ध उढाण,प्रा. दत्ता पटाईत,डॉ.शंकर तिकांडे, प्रा.अंकुश गडदे,श्रीधर गाढे आदी उपस्थित होते.



## वडीरामसगाव ग्रामपंचायतीला क्षयरोग मुक्त गाव पुरस्कार जाहीर

घनसावंगी ।प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील वडीरामसगाव या गावात एकही क्षयरोग (टी. बी) रुग्ण न आढळल्यामुळे क्षयरोग (टी. बी) मुक्त गाव म्हणून एक कास्य व एक रौप्य पदक, मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सरपंच दत्तात्रय कुंडलिकराव वराडे यांचा गौरव केला. यावेळी गावातील ज्येष्ठ समाजसेवक गजानन बापू वराडे, पत्रकार मारोती सावंत, व ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. कुंभकर्ण, डॉ. कालापहाड, डॉ. लघुटे, कर्मचारी हनुमान सोनवणे उपस्थित होते.



## शेतकऱ्यांसाठी शून्य ऊर्जेवरील शीतकक्ष प्रात्यक्षिक सेलूतील बोर्डीकर कृषी महाविद्यालयाचा उपक्रम

सेलू ता.२७ : सेलू येथील बोर्डीकर कृषी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनींनी वालूर येथे शून्य ऊर्जेवर आधारित शीतकक्ष तयार करण्याचे प्रात्यक्षिक यशस्वीरीत्या दाखवले. हा नाविन्यपूर्ण शीतकक्ष भाजीपाला आणि फळांच्या योग्य साठवणुकीसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. वालूर येथे पार पडलेल्या या प्रात्यक्षिकादरम्यान, कृषीकन्यांनी शेतकऱ्यांना विटा, वाळू, बांबू आणि वाळलेल्या गवताचा वापर करून अत्यंत कमी खर्चात शीतकक्ष कसा तयार करायचा, हे समजावून सांगितले. अशा प्रकारच्या कक्षामुळे पालेभाज्या व फळांची नासाडी टाळता येते आणि त्यांची साठवणूक अधिक प्रभावीपणे करता येते.

यावेळी, कृषीकन्यांनी शीतकक्ष उभारणीसाठी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. यामध्ये कक्षाचा आकार साधारणपणे ५५३ फूट असावा. शीतकक्ष नेहमी सावलीच्या जागी उभारला जावा. कक्षावर झाकण्यासाठी बांबूचे किंवा नारळाच्या झावळीचे छत तयार करावे. फळे व पालेभाज्या साठवण्यापूर्वी कक्ष पूर्णपणे भिजवून घ्यावा. या प्रात्यक्षिकात सहभागी २७ कृषीकन्यांना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. ए.ए. चव्हाण, कार्यक्रम समन्वयक डॉ. नीरज चव्हाण आणि डॉ. एन.आर. गटकळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## परभणीत बबनराव लोणीकर यांचा वक्तव्याचा निषेध

# युवक कॉंग्रेसच्या वतीने आंदोलन

### लोणीकर यांना कपडे, बुट, साडीचोळी पोस्टाने पाठविले

परभणी/प्रतिनिधी

येथे आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकर्या विरूध्द केलेल्या व्यक्तव्याचा जाहिर निषेध करत कपडे, बुट, साडीचोळी, मोबाईल आणि पैसे पोस्टाने पाठवून शेतकरी विरोधी वक्तव्याचा जिल्हा युवक कॉंग्रेसच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले पुतळा परिसरात गुरूवारी (दि.२६) निषेध करण्यात आला.

आमदार बबनराव लोणीकर यांनी तुझ्या बापाला पेरणीचे पैसे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले, तुझ्या अंगावरचे कपडे आम्ही दिलेत, असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. या वक्तव्याचा परभणी येथे युवक कॉंग्रेसच्या वतीने निषेध करण्यात आला. युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष अमोल जाधव यांनी सांगितले की, भारतीय जनता पक्षाचे नेते मागील दहा वर्षांत शेतकर्यांच्या विरुद्ध गरळ ओकत आहेत. त्यांना शेतकर्यांचे काही देणंघेणं नाही. भाजप नेते ब्रिटिशांची देशी आवृत्ती आहेत. लोकशाहीत ही भाषा वापरणारे सविधान विरोधी असल्याचा आरोप यावेळी कॉंग्रेसचे अमोल जाधव यांनी केले. प्रवक्ते सुहास पंडित यांनी सांगितले की, 'शेतकर्यांचा आसूड' या पुस्तकातून महात्मा फुले यांनी शेतकर्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली आणि त्यांच्या हक्कांसाठी लढा देण्याचे आवाहन केले, ज्यामुळे समाजाला एक नवीन दिशा मिळाली.



या आंदोलनात युवक कॉंग्रेसचे पदाधिकारी प्रदीप सोनटक्के, उपसभापती अजय चव्हाण, सुहास पंडित, दिगंबर खरवडे, वैजनाथ देवकते, श्रीराम जाधव, अंगद सोगे, शजी अहमद खान, तानाजी भोळे, शेख नबी, राम कुर्हे, विजय मोरे, राज बहिरट आदी उपस्थित होते.